



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६४ वे * अंक १९२ * नांदेड * शनिवार, दि. १९ जुलै २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


# राडेबाजी आणि हाणामारीने पावसाळी अधिवेशनाचं सूप वाजलं

## पावसाळी अधिवेशनात १६ विधेयकं मंजूर –मुख्यमंत्री

## ८ डिसेंबरपासून नागपूर हिवाळी अधिवेशन

**मुंबई (प्रतिनिधी)–** पावसाळी अधिवेशनाचा समारोप झाला आहे. या अधिवेशनात राडेबाजी आणि हाणामारीने गाजले. पुढील हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासून नागपूर येथे सुरू होणार आहे. तसेच या अधिवेशनात १६ विधेयकं आम्ही पास केली असल्याचे वक्तव्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. राज्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडत आहे. ९३ टक्के पाऊस आतापर्यंत पडला आहे. धरणात चांगला साठा आहे. खरिपाचा हंगाम यंदा चांगला असेल. पावसाची कामगिरी दमदार आहे तशीच आमच्या सरकारची देखील दमदार आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्रातील ११ किल्ले आणि तामिळनाडूतील जिंजी अशा १२ किल्ल्यांचा जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे. सरासरीपेक्षा अधिक पाऊस आता पडत आहे. ९३ टक्के पाऊस आतापर्यंत पडला आहे. पंचनामे करण्याचे आदेश दिलेत, काही भागात पूर परिस्थिती निर्माण



झाली आहे. नुकसान झालेल्यांना पैसे वाटप करतोय. धरणात चांगला साठा आहे. खरिपाचा हंगाम यंदा चांगला असेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

एससीएसटी समाजाच्या आयोगांना वैधानिक दर्जा दिला आहे. जनसुरक्षा विधेयक यासंदर्भात अनेक अफवा पसरवण्यात आल्या आहेत. सगळ्या बैठका समितीच्या खेळीमेळीत पार पडल्या. ज्या सुराधणा सुचवल्या त्याच क्षणी

### राज्यातील जनता आपल्याला शिव्या देतेय, म्हणतेय, सगळे आमदार माजले –फडणवीस

राज्यातील जनता आपल्याला शिव्या देत देत आहे, आज बाहेर ज्या काही शिव्या पडत आहे, त्या एकट्या पडळकर किंवा यांच्या माणसाला पडत नाहीत. आपल्या सगळ्यांच्या नावाने याठिकाणी बोलले जाते, हे सगळे आमदार माजले आहेत. त्यामुळे या गोष्टी गांभीर्याने घ्या. प्रत्येक गोष्टीचं राजकारण करुन आपण महाराष्ट्रातील जनतेला काय सांगणार आहोत, असा संताप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

त्या स्वीकारल्याचे फडणवीस म्हणाले. नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण आपण केलं आहे. गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण विधेयक मंजूर केलं आहे. मकोकात आता नार्कोटिक्स घेण्याचे देखील ठरवले आहे. पुरवणी मागण्यांना मान्यता देण्यात आली असल्याचे फडणवीस म्हणाले.

# 'दुकानं नाही, शाळाही बंद करणार', राज ठाकरेंचा सरकारला इशारा



**मुंबई (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तिसरी हिंदी भाषा आम्ही सक्तीची करणार असे म्हटले आहे. राज्य सरकारला आत्महत्या करायची असेल तर बेशक करावी. त्या दिवशीच्या मोर्चाच्या धसक्याने निर्णय मागे घ्यायला लागला होता. फडणवीस जी, तिसरी भाषा सक्तीची आणणार म्हणजे आणणार. तुम्ही पहिली ते पाचवी हिंदी आणण्याचा प्रयत्न तर करून बघा. दुकानं नाही, शाळाही बंद करेन, अशा थेट इशारा राज ठाकरेंनी सरकारला दिला आहे.

राज ठाकरे यांनी शुक्रवारी मीरा रोड परिसरातील नित्यानंद नगरमध्ये सभा घेतली. सभेआधी राज ठाकरेंचं जंगी स्वागत करण्यात आलं. राज ठाकरे यांच्या या सभेला प्रचंड गर्दी जमली होती. त्यामुळे पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. येथील मनसेच्या शाखेचंही राज ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन पार पडले. यावेळी बोलताना राज ठाकरे यांनी हिंदीवरून राज्य सरकारला गंभीर इशारा दिला आहे.

पुढे राज ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्राचा मुख्यमंत्री हिंदीसाठी भांडतोय, महाराष्ट्रासाठी मराठी सक्तीची. इतर शाळात मराठी सक्तीची केली पाहिजे. ते सोडून हिंदी सक्तीची करत आहात. कोणाच्या दबावाखाली. कोण दबाव टाकतं तुमच्यावर. केंद्राचं हे पूर्वीपासूनचं आहे. काँग्रेस असल्यापासूनचं हे सगळं आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला. त्याचा प्रचंड मोठा लढा झाला. मुंबई महाराष्ट्रापासून बाजूला करण्याचा डाव होता.

### 'दुबे, मुंबईत ये तुला समुद्रात डुबे डुबे के मारेंगे'

भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी महाराष्ट्र बाहेर या, तुम्हाला आपटून आपटून मारु, असं आव्हान निशिकांत दुबे यांनी केलं. यावर मनसे प्रमुख राज ठाकरेंनी पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली असून हल्लाबोल केला आहे. दुबेने मुंबईमध्ये दाखवून यावे, समंदर मे डुबे डुबे कर मारेंगे असं म्हणत राज ठाकरेंनी धमकीवजा इशाराच दिला आहे.

### निवडणूक जाहीर झाल्यावर राज ठाकरेंसोबत चर्चा करु –उद्धव ठाकरे

अनेक वर्षांनंतर आम्ही दोघे व्यासपीठावर एकत्र आलो ते एकत्र राहण्यासाठी असं सूचक वक्तव्य शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दुपारी पत्रकारांशी बोलताना केलं. आताच कोणतीही निवडणूक जाहीर झालेली नाही, झाली तर चर्चा करु शकतो, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी दिली.

# प्रवीण गायकवाड यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

## जशास तसे उत्तर दिले जाईल -जावळे



छायाचित्र नरद्र

**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठा समाजाच्या युवकांना दिशा देण्याचे काम करणाऱ्या संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांचे कार्य आम्हा समविचारी संघटनांना मोलाचे मार्गदर्शन करणारे आहे. त्यांच्यावर हल्ला करणाऱ्या व घडवून आणणाऱ्यांना आमचे सांगणे आहे की, आम्ही त्यांना जशास तसे उत्तर देऊ, असा इशारा अखिल भारतीय छावाचे अध्यक्ष नानासाहेब जावळे यांनी दिला आहे.

संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावरील प्राणघातक हल्ल्याच्या निषेधार्थ एकदिवसीय धरणे आंदोलन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकल मराठा समाज व समविचारी संघटनेच्यावतीने शुक्रवार, दि. १८ जुलै रोजी करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनी महाराष्ट्रभरात जिजाऊ, फुले, शाहु, आंबेडकर विचारधारा जोपासण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. मराठा बहुजन मुलांच्या हातात लाठ्याकाठ्या ऐवजी पुस्तके दिली आणि युवकांचे मस्तक सशक्त केले. राज्यात जेव्हा-जेव्हा दंगलग्रस्त परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला, तेव्हा राज्यात शांतता राहण्यासाठी प्रयत्न करणारी संघटना म्हणजे संभाजी ब्रिगेड आहे. हे महाराष्ट्रातच नाही तर देशाला माहीत आहे, अशा संघटनेच्या प्रदेशाध्यक्ष यांच्यावर प्राणघातक हल्ला करणारा हल्लेखोर दीपक काटे यांची पार्श्वभुमी गुन्हेगारी वृत्तीची असून देखील यांच्यावर अत्यंत साधे जामीन पात्र गुन्हे दाखल करण्यात आले. हा गुन्हा सुद्धा संघटित गुन्हेगारीत मोडतो म्हणून मोका कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा. सदरील सर्व आरोपीची एसआयटीमार्फत चौकशी करण्यात यावी. हा हल्ला पुर्वनियोजित असून हल्ल्याचा कट हा पुर्वीच रचला गेला असल्याने तसे गुन्हे त्यावरती दाखल करण्यात यावेत. संबंधित आरोपीने यापूर्वी अनेकदा धमकावणे, भीती घालणे, चितावणीखोर वक्तव्य करणे, जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, सार्वजनिक ठिकाणी अब्रू घालवणे असे कृत्य आरोपीने जाणुन-बुजुन केले असल्याने त्यांच्यावरती गंभीर गुन्हे दाखल करावे. तसेच संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्या जीवितास धोका असून त्यांना शासकीय खर्चाने सुरक्षा प्रधान करणे या मागण्यासाठी सकल मराठा समाज बांधवांच्यावतीने एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. लवकरात लवकर या मागण्या मान्य न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांना देण्यात आले.

यावेळी सकल मराठा समाज, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, मातंग परिवर्तन विचार मंच, राष्ट्रीय संविधान बचाव अभियान या समविचारी संघटनेचे पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# रेती तस्करांवर आता फौजदारीसह प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेची कारवाई होणार

## महसूल व वन विभागाकडून शासन आदेश जारी

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यभरामध्ये अवैध रेतीसह गौण खनिज उत्खनन वाहतूक व तस्करीचे वारंवार प्रकार घडत असतात. त्यामुळे महसूल व पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होते. राज्य शासनाने आता महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांना दंडासह फौजदारी कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेच्या तरतूदीचा शासन आदेश जारी केला आहे. त्यामुळे आता रेती तस्करीला आळा बसला जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

राज्यात गौण खनिजा बाबतचा विषय हा महसूल व वन विभागाकडून हाताळण्यात येतो. ज्यासाठी महाराष्ट्र गौण खनिज विकास व विनियमन नियम २०१३ तयार करण्यात आलेला आहे. रेती व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन, वाहतूक तसेच तस्करी यामुळे गुन्हेगारी कारवाया वाढत आहेत. त्यास प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील तरतुदीनुसार केवळ दंडात्मक कारवाई न करता संबंधिताविरुद्ध फौजदारी कारवाई म्हणजेच एफआयआर दाखल करण्याचे महसूल विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना राज्यपालाच्या आदेशाने महसूल व वन विभागाचे कार्यासन अधिकारी सदानंद मोहिते यांनी दि. १७ जुलै २०२५ रोजी जारी निर्देश केले आहेत. राज्य शासनाच्या या आदेशामुळे अशा व्यक्तीने विरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करताना महसूल जमीन अधिनियम १९६६, भारतीय न्याय संहिता, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९६६, खाण आणि खनिज अधिनियम १९५८ व सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम यातील विविध कलमांच्या अनुषंगाने गुन्हे दाखल करण्याची कारवाई पोलीस, महसूल अधिकारी कर्मचारी व संबंधित सक्षम अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तसेच या आदेशामध्ये महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हिडिओ पायरेट्स, अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे व्यक्ती व विघातककर्त्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ मध्ये सुधारणा करीत रेती तस्करांचा समावेश करण्यात आला आहे.

# आमदार जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात गुन्हा दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जितेंद्र आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना गुरूवारी पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं. नितीन देशमुख यांना विधानभवनातून बाहेर घेऊन जात असताना जितेंद्र आव्हाड यांनी पोलिसांची गाडी अडवण्याचा प्रयत्न केला होता. सरकारी कामात अडथळा आणल्यामुळं जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात मुंबई पोलिसांनी मरिन ड्राईव्ह पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# राज्यातील २५८ खाजगी रुग्णालयांचे परवाने रद्द

**मुंबई (प्रतिनिधी)–** खाजगी आरोग्य क्षेत्रातील गैरव्यवहारांवर निर्णायक कारवाई करत, महाराष्ट्र सरकारने बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ चे उल्लंघन केल्याबद्दल २५८ खाजगी रुग्णालयांचे परवाने रद्द केले आहेत. राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी विधानसभेत ही घोषणा केली. या वर्षी केलेल्या दोन व्यापक तपासण्यांमध्ये हे उल्लंघन उघड झाले होते.

राज्यातील २३,३५४ खाजगी रुग्णालयांची तपासणी केली असता, त्यापैकी तब्बल ५,१३४ रुग्णालये कायद्याचे उल्लंघन करताना आढळली, ज्यात पायाभूत सुविधा, कर्मचारी संख्या, स्वच्छता, अग्निसुरक्षा, कचरा विल्हेवाट, बिलिंगमध्ये पारदर्शकता आणि तक्रार निवारण प्रणाली यांसारख्या मानकांचा समावेश होता. या ५,१३४ रुग्णालयांना नियमांचे पालन करण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या होत्या, परंतु पाठपुराव्याच्या तपासणीत २५८ रुग्णालये नियमांचे पालन करण्यात अपयशी ठरली, ज्यामुळे त्यांची नोंदणी रद्द करण्यात आली.

# ग्रामीण गुंठेवारीला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

## आ. आनंदराव बोंढारकर यांच्या मागणीला यश

**नांदेड (प्रतिनिधी)–** ग्रामीण भागातील गुंठेवारीला मुदतवाढ द्यावी, या अनुषंगाने आ. आनंदराव बोंढारकर यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे दि. १ जुलै २०२५ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली होती. या मागणीला यश आले असून आता ग्रामीण भागातील गुंठेवारीला ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.



ग्रामीण भागातील गुंठेवारीचे प्रस्ताव दाखल करण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय, नांदेड (चिखलवाडी कॉर्नर नांदेड) येथे गुंठेवारी कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तरी नांदेड व अर्धापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील गुंठेवारीचे प्रस्ताव दाखल करण्यास ३१ डिसेंबर २०२५ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यामुळे नागरिकांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय, नांदेड येथे गुंठेवारीचे प्रस्ताव दाखल करावेत, असे आवाहन नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आ. आनंदराव बोंढारकर यांनी केले आहे.

ग्रामीण भागातील जमिनी खरेदी विक्री करण्यासाठी गुंठेवारी नसल्याने अनेक अडचणी येत होत्या. २२ ऑगस्ट २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंतच्या मुदतीनंतर आतापर्यंत ग्रामीण भागातील गुंठेवारीसाठी मुदत वाढ देण्यात आलेली नव्हती. तब्बल दोन वर्षापासून ग्रामीण भागात गुंठेवारीसाठी मुदत वाढ देण्यात आली नसल्याने मालमत्ता धारकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. आपल्या कुटुंबातील पाल्याच्या विवाहसह त्यांच्या शिक्षणासाठी ही मालमत्ता धारकांची मोठी आर्थिक कोंडी होत होती. ग्रामीण भागातील मालमत्ता खरेदी विक्री बंद होती. या पार्श्वभूमीवर आ. बोंढारकर यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची पावसाळी अधिवेशनादरम्यान भेट घेऊन ग्रामीण भागातील गुंठेवारीला मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. या मागणीचे निवेदनही त्यांनी बावनकुळे यांना दिले होते. या निवेदनावर शासनाने सकारात्मक विचार करत आता ग्रामीण भागातील गुंठेवारीला ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. संबंधित मालमत्ताधारकांनी या मुदतवाढीचा लाभ घ्यावा असे आवाहन आ. आनंदराव बोंढारकर यांनी केले आहे.













# उत्तराखंडमध्ये जीप नदीत कोसळून ८ जणांचा मृत्यू

**डेहराडून (प्रतिनिधी)–** उत्तराखंडच्या पिथोरागड येथे जीप नदीत कोसळून झालेल्या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला. तर ५ जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातग्रस्त वाहन मुवानीहून बोक्ता गावाकडे जात असताना हा अपघात झाला.

उत्तराखंडच्या पिथोरागड जिल्ह्यात प्रवाशांना घेऊन जाणारी जीप नियंत्रण गमावून १५० मीटर खोल नदीत कोसळली. या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एका शाळकरी मुलीसह ४ महिलांचा समावेश आहे. तर ५ जण जखमी आहेत. जीपमध्ये एकूण १३ प्रवासी होती. अपघाताची बातमी पसरताच परिसरात शोककळा पसरली आणि स्थानिक लोकांनी प्रशासनासह तातडीने बचावकार्य सुरू केले.

जखमींना दरीतून बाहेर काढून उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात पाठवण्यात आले. अपघातग्रस्त जीप प्रवाशांना घेऊन मुवानीहून बक्ताकडे जात होती. जीप बक्तापासून थोड्या अंतरावर होती. अचानक चालकाचे नियंत्रण सुटले आणि जीप खड्ड्यात उलटून नदीत पडली. सोनी पुलाजवळ हा अपघात झाला. नदीत कोसळल्याने जीपचा चुराडा झाला. जीप शेजारीच प्रवाशांचे मृतदेह पडले होते. स्थानिकांनी तात्काळ पोलिसांना या घटनेची माहिती दिली.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# संसदेचे अधिवेशन : विकास कामांना संधी की पुन्हा गदारोळ?

सोमवारपासून सुरू होणारे संसदेचे पावसाळी अधिवेशन सरकारसाठी मोठ्या आर्थिक सुधारणांच्या संधीचं व्यासपीठ ठरणार आहे, तर विरोधकांसाठी हे अधिवेशन सरकारला उघडं पाडण्याची रणनीती आखण्याचा मंचही ठरणार आहे. केवळ १७ दिवसांच्या कालावधीत नरेंद्र मोदी सरकारने अनेक महत्त्वाची विधेयके सादर करण्याची तयारी केली आहे. त्यामध्ये १०० टक्के विदेशी गुंतवणुकीला मुभा देणारे विमा विधेयक, सुलभ आयकर कायदा, कंपनी कायद्यामधील सुधारणा, दिवाळखोरी कायदा यांचा समावेश आहे. मात्र या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर विरोधकांचा आक्रमक पवित्रा हे अधिवेशन वादळाने भरलेले ठरण्याची शक्यता निर्माण करतो. मोदी सरकारचे हे अधिवेशन देशाच्या आर्थिक भविष्यासाठी निर्णायक ठरू शकते. अनेक वर्षांपासून रेंगाळलेली विमा क्षेत्रातील १०० टक्के विदेशी गुंतवणुकीला परवानगी देण्याची प्रक्रिया अखेर विधेयकाच्या माध्यमातून पूर्णत्वास जाणार आहे. त्यामुळे विमा कंपन्यांमध्ये परदेशी गुंतवणूक वाढेल आणि त्यातून सेवांचा प्रसार तसेच स्पर्धा निर्माण होईल. त्याचप्रमाणे आयकर कायद्यात सुलभता आणून करदात्यांना अधिक सोपे, पारदर्शक आणि वेगवान करप्रणाली अनुभवता यावी, हा सरकारचा हेतू आहे. कंपनी कायद्यातील फास्ट ट्रॅक विलिनीकरणाच्या प्रक्रियेला अधिक व्यापक करण्याचे प्रस्तावही याच अधिवेशनात मांडले जाणार आहेत. यामुळे उद्योजकांना कंपन्यांच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया सुलभ होईल. दिवाळखोरी आणि नादारी कायद्यातील बदल म्हणजे संकटात सापडलेल्या कंपन्यांना लवकर सावरता यावे, हा उद्देश स्पष्ट आहे. त्याचप्रमाणे इन्शुरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटीला विमा सेवा पोहोचवण्यासाठी कमी भांडवली मर्यादा ठरवण्याचा अधिकार देऊन, ग्रामीण व दुर्लक्षित भागात विमा सुविधा वाढवण्याचा प्रयत्नही यामध्ये आहे. या आर्थिक सुधारणांच्या प्रस्तावांना जेवढे सरकारकडून महत्त्व दिले जात आहे, तेवढेच तीव्र राजकीय मुद्द्यांवर विरोधक सरकारला घेरण्यास सज्ज झाले आहेत. पहलगाम येथे झालेला दहशतवादी हल्ला, 'ऑपरेशन सिंदूर' संदर्भातील गोपनीयता, पाकिस्तानशी झालेली अचानक शस्त्रसंधी, बिहारच्या निवडणूक यादीतील फेरबदल अशा विविध मुद्द्यांवर विरोधक आक्रमक होणार आहेत. विशेष म्हणजे विरोधक सध्या राज्यपातळीवर विखुरलेले असले तरी संसदेच्या चार भिंतीत एकत्र येत सरकारविरोधात एकसंघ लढा उभारण्याचा प्रयत्न करतात. विशेष अधिवेशनाची मागणी करूनही केवळ १७ दिवसांचे अधिवेशन बोलावण्यात आल्यामुळे विरोधकांमध्ये असंतोष आहे. त्यामुळे अधिवेशनाच्या सुरुवातीपासूनच वातावरण तापलेले असेल, याची शक्यता आहे. परिस्थितीनुसार हे अधिवेशन कमी दिवसात देखील गुंडाळले जाऊ शकते. असे मागे अनेक वेळा झाले आहे. या पार्श्वभूमीवर, सरकारसाठी मोठा प्रश्न असा आहे की, इतक्या कमी कालावधीत आर्थिक सुधारणा विधेयके मंजूर करणे कितपत शक्य होईल? विरोधकांच्या गदारोळात कामकाज ठप्प होण्याची शक्यता अधिक आहे. असे होत गेल्यास देशाचे करोडो रुपयांचे नुकसान होत असते, याची जाण विरोधकांनी ठेवणे गरजेचे आहे. विशेषतः प्रत्येक विधेयकासंदर्भात चर्चेची मागणी आणि विविध स्थायी समित्यांकडे ते पाठवण्याची मागणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आर्थिक अजेंड्याचे वजन पेलण्याची व त्याची अंमलबजावणी शक्य करण्याची कसोटी सरकारची आहे. काही विधेयकांच्या विरोधात सार्वजनिक जनभावना देखील सरकारला अडथळा आणू शकते. या पावसाळी अधिवेशनात सरकारला आर्थिक सुधारणांची गती द्यायची आहे की, फक्त विरोध करून विरोधकांना राजकीय मुद्द्यांवर सरकारची कोंडी करायची आहे हे अधिवेशनाच्या काळातच दिसून येईल. हे अधिवेशन म्हणजे आर्थिक सुधारणांच्या दृष्टीने एक ऐतिहासिक संधी आहे, पण ती राजकारणाच्या वादळात वाहून जाऊ नये याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सरकारने संवादाचा मार्ग स्वीकारत पारदर्शकपणे विधेयकांचे सादरीकरण करावे, तर विरोधकांनीही बांधीलकीने संसदेत चर्चा व कार्यवाहीसाठी सकारात्मक भूमिका घ्यावी. अन्यथा देशाच्या भविष्यासाठी महत्त्वाचे असलेले हे अधिवेशन केवळ आरोप-प्रत्यारोपांची रणभूमी बनण्याचा धोका आहे.

# हा दैवयोग आहे..!



दिवसामागून दिवस निघून जातात. महिने-महिने करत वर्ष ही जाते. अनेक वर्षे होतात. माणसाच्या आयुष्यात वेगवेगळ्या वळणावर, वेगवेगळी माणसे येतात आणि जातात. याच अनेक माणसांमध्ये काही माणसं हृदयाच्या तळापर्यंत पोहोचतात. काहीचा सहवास हवाहवासा वाटायला लागतो. काही मात्र क्षणभराच्या सहवासासाठीही नको वाटतात. अनेक माणसे, अनेक स्वभाव. 'मूर्ती तितक्या प्रवृत्ती.' प्रत्येकाच्या वेगवेगळ्या पद्धती, प्रत्येकाचे वेगवेगळे विचार. माणसं आणि त्यांचा स्वभाव आवडण्यासाठी किती क्षणाचा सहवास अपेक्षित असतो...? हे निश्चित सांगता येत नाही. कुणाचा क्षणभराचा सहवासही सुखावून टाकतो. कायम स्मरणात राहतो.

हा स्नेह वंचना की,
काहीच आकळेना
आयुष्य ओघळोनी.
मी रिक्तहस्त आहे

कोण कोणासोबत किती काळ राहिला...याला फारसं महत्त्व नसतं. तर त्याच्या असण्याने, त्याच्या वागण्याने-बोलण्याने माणसाच्या मनावर किती खालवर परिणाम झाला. हे महत्त्वाचं असतं. कोणताच माणूस चांगला किंवा वाईट नसतो. ती आपली संकल्पना असते. तो आपला दृष्टिकोन असतो. त्याच्या वागण्या-बोलण्याचे पडसाद असतात. सगळीच माणसं, सगळ्याच परिस्थितीत, सारखी वागत नाहीत. तसंच प्रत्येक माणूस प्रत्येकाशी सारखा वागत नाही. व्यक्ती-व्यक्तीनुसार, विविध घटकानुसार, त्याचं वागणं-बोलणं बदलत असतं. माणसाचा स्वभाव वस्तुनिष्ठ नसतो, तर व्यक्तिनिष्ठ असतो. म्हणूनच एकाच माणसाबद्दल प्रत्येकाची वेगवेगळी मते असू शकतात.

काटा रुते कुणाला,
आक्रंदतात कोणी
मज फुल ही रुतावे..
हा दैवयोग आहे

बारीक-सारीक प्रत्येक गोष्टींचा हिशोब आपण ठेवतो. ईश्वराने दिलेल्या 'अमूल्य भेटी'चा हिशोब आपण ठेवत नाही. खरंतर ईश्वराची 'अमूल्य भेट' म्हणजे आपलं 'जीवन'. ते वारेमाप पद्धतीने आपण उधळत असतो. 'टाईमपास' या नावाखाली वाट्टेल ते करतो. कधी विचारच करत नाही की, आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण किती महत्त्वाचा आहे. दिवसा दिवसांनी संपत जाणारी गोष्ट म्हणजे आयुष्य. प्रत्येकाचेच आयुष्य मर्यादित आहे. मर्यादित आयुष्यात जेवढं चांगलं वागता येईल, तेवढं वागलं पाहिजे. जेवढे भरभरून बोलता येईल, तेवढं बोललं पाहिजे. साधं-साधं, सोपं- सोपं, सरळ-सरळ जीवन जगलं पाहिजे. विनाकारण गुंतागुंत वाढवायची नाही, जेवढे गुंते सोडवता येतील तेवढे सोडवायचे. काही समस्या सुटत नाहीत... तिथे विनाकारण वेळ वाया घालवायचा नाही. आयुष्यात अनेकांच्या स्मरणात राहू, असं जीवन जगायचं.

हसून पहावं, रडून पहावं.
जीवनाकडे माणसाने डोळे
भरून पाहावं...
काहीतरी द्यावं,
काहीतरी घ्यावं
आपण गेल्यावर....
आपलं नाव
कोणीतरी काढावं...

एवढं तरी चांगलं जीवन आपण नक्कीच जगायला पाहिजे. आपल्या अनुपस्थितीत आपलं नाव काढल्याने कुणाच्या तरी चेहऱ्यावर हसू यावं. आपण गेल्यावर चार माणसांच्या तरी डोळ्यात पाणी यावं.. शेवटी औटघटकेचे राज्य आहे. कधीतरी जाणार...म्हणून जमेल तेवढे चांगलं वागा.

माणसाला माणसाच्या आयुष्यात कशाची भुरळ पडेल. हे त्याचं त्यालाही माहीत नसतं. म्हणून तर माणसं वहावत जातात. तरीसुद्धा ते आपल्या भ्रमात असतात. प्रवाहासोबत वाहत असले, तरी माझ्यामुळेच हा प्रवाह आहे. हा भ्रम असतो. प्रवाह ओसरल्यावर कळतं, आपल्यामुळे प्रवाह नव्हता. आपण प्रवाहासोबत होतो. हे कळल्यावरही, माणसं जागी होतातच असं नाही. पुन्हा दुसऱ्या प्रसंगातही ते तसेच वागताना दिसतात. हाच खरा 'मनुष्य स्वभाव' आहे. पुन्हा-पुन्हा चुका होऊ नयेत, म्हणून माणसाने घडणाऱ्या प्रत्येक प्रसंगाकडून, घटनेकडून काहीतरी शिकलं पाहिजे.

कोणती माणसं आपल्या आयुष्यात यावीत, येतील. किती दिवस एकमेकांचा सहवास लाभेल...? हे सगळं सुनिश्चित असतं. तेवढेच दिवस आपण एकमेकांच्या संपर्कात येतो. एकमेकांशी संवाद साधतो. विचारांची देवाण-घेवाण करतो. सुनियोजित दिवशी पुन्हा वेगवेगळ्या रस्त्याने प्रवास सुरू करतो. सोबत राहतात, त्या फक्त आठवणी. त्या एकमेकांची शेवटपर्यंत सोबत करतात. ह्या आठवणी कुणी सांगतो, तर कुणी अजिबात सांगत नाही. याचा अर्थ असा नाही त्यांना काही आठवतच नाही. याउलट असंही असतं...त्या आठवणींनी त्यांचे मन आजही विचलित होत असतं. म्हणून ते घाबरत असतात त्या आठवणींना... त्या आठवणीतल्या दिवसांना. अर्थात आठवणीसोबत असणाऱ्या त्या माणसाला...

खरं तर काहीच कारण नसेल, किंवा काही घडलेच नसेल, तर त्याविषयी बोलायला काय हरकत आहे. ज्याअर्थी आपण तो विषय, ती व्यक्ती टाळण्याचा प्रयत्न करतो...त्याअर्थी त्या विषयाबद्दल, त्या व्यक्तीबद्दल आपल्या मनात अनेक प्रकारचे विचार असतात. अनेक प्रकारच्या भावना, संवेदना असतात. आजही त्यांना तेवढंच महत्त्व असतं. म्हणून आपण टाळत असतो त्या आठवणींना...आठवणीतल्या व्यक्तींना...

बऱ्याच वेळी बोलण्यामुळे होणाऱ्या जखमेपेक्षा, अबोल्याने झालेल्या जखमा अधिक त्रास देतात. एखाद्या माणसासोबत आपण बोलतो... यामागे जेवढे प्रेम, आपुलकी, माया, जिव्हाळा असतो त्याहीपेक्षा ज्या माणसा-सोबत आपण अबोला धरतो त्यामध्ये या सर्व भावनांचा जास्त समावेश असतो.

काही करू पहातो,
रुजतो अनर्थ तेथे
माझे अबोलणे ही..
विपरीत होत आहे

जसं विनाकारण आपण कुणाला भेटत नाही; तसं विनाकारण आपण कुणाला टाळतही नाही. भेटण्याला जेवढं महत्त्व असतं; त्याहीपेक्षा जास्त महत्त्व टाळण्याला असतं. या सगळ्या भावना आपल्याला अपराधीपणाची जाणीव करून देत असतात. आपल्या चुकांची, आपण केलेल्या अन्यायाची जाणीव करून देतात. समोरच्या निरागस माणसाला आपण कसं फसवलं... याची आठवण देतात. पैसा, प्रतिष्ठा आणि व्यवहार यापेक्षा भावना फार महत्त्वाच्या असतात. ते आज कळत असतं. आपली 'मतलबी भूमिका' आज ध्यानात आलेली असते. खरंच आपल्या मनात काही नसेल तर आपण खूप मनमोकळेपणाने वागतो.


मनात खोलवर रुजलेल्या अशा जखमांवर कितीही पट्टी बांधली. अशा जखमा कितीही झाकल्या, तरी त्या वेदनाच देतात. जखम असणाऱ्यांना तो दाह कायमच राहतो. जखमेची ठसठस तशीच राहते. त्या आठवणींच्या जखमांवर फक्त आठवणीतलाच माणूस मलम लावू शकतो, फुंकर घालू शकतो. आपण कितीही सुखात असलो. तरी ते सुख त्या माणसाकडे अभिव्यक्त केल्याशिवाय अपूर्ण असतं. अशीच माणसाच्या आयुष्यात आलेली, आणि कायम घर करून गेलेली माणसं... कितीही दूर असली, तरी ती आठवणीच्या रूपात आपल्या सोबत असतात. त्यांचे हे अमूर्त वास्तव्य आपण जपायचं. फक्त कुठल्याच आठवणींची 'जखम' होऊ द्यायची नाही..

सांगू कशी कुणाला?
कळ आतल्या जिवाची
चिरदाह वेदनेचा
मज श्राप हाच आहे.

याउलट या आठवणींचं बळं निर्माण करायचं. आठवणींना आणि आठवणीतल्या माणसांना कायम स्मरणात ठेवायचं. मात्र एकमेकांच्या चुका विसरून जायचं. माणसं म्हटली की, चुका होणारच. त्या चुकांना आज काहीच अर्थ नसतो. दोघेही एकमेकांच्या जीवनात सुखी असतात. उगीच त्याच-त्याच गोष्टी उगाळत बसण्यात काहीच अर्थ नसतो. भरभरून बोलून मन मोकळं करून टाकायचं. मनसोक्त हसायचं. कुणाचं कुणावर किती प्रेम होतं...? याला आज काहीच अर्थ नाही. आजच्या आयुष्यात आपण सुखी आहात का...? हेच महत्त्वाचं आहे. आठवणींना जपा...आठवणी ताज्या करा...आणि मनापासून म्हणा... अशी पाखरे येती... आणिक स्मृती ठेवुनी जाती... दोन दिसाची रंगत-संगत... दोन दिसाची नाती.

**-मयूर मधुकरराव जोशी**
विठ्ठल रुक्मिणी नगर,
जिंतूर, जि. परभणी.
मो. ९७६७७३३५६०
७९७२३४४१२८

# भारताचा आईन्स्टाईन : डॉ. जयंत नारळीकर



१९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे जन्मलेल्या जयंत नारळीकर यांना घरातूनच विद्वत्तेचा वारसा लाभला होता. वडील विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रख्यात गणितज्ज्ञ होते तर आई सुमती ह्या (माहेरचे नाव कृष्णा शंकर हुजूरबाजार) संस्कृतच्या स्कॉलर होत्या. बनारस हिंदू विद्यापीठातून १९५७ साली बी.एस्सी. पदवी घेतल्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. १९५९ साली केंब्रिज विद्यापीठाची 'ट्रायपास' ही गणितातील अवघड परीक्षा वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी पास होऊन वडिलांप्रमाणे ते रैंगलर झाले. यानंतर त्यांनी जगप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ डॉ. फ्रेड हॉएल यांच्या मार्गदर्शनाखाली विश्व उत्पत्ती संबंधी संशोधन करून सिद्धांत मांडला (१९६३). 'अंतर्गत स्फोट होऊन सूर्यापासून पृथ्वी आणि इतर ग्रह निर्माण झाले' हा त्यांच्या सिद्धांताचा मुख्य आशय. त्यानंतर १९७२ पर्यंत तेथे 'इंस्टीट्यूट ऑफ एसट्रोनॉमी' (Institute of stronomy) मध्ये संशोधनकार्य केले. आपल्या संशोधनाचा आपल्या देशाला उपयोग व्हावा म्हणून ते १९७२ मध्ये भारतात परतले व मुंबईच्या 'टाटा इंस्टीट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च' या जगप्रसिद्ध संस्थेत दाखल झाले. तेथे ते अनेक मानाची व जबाबदारीची पदे भूषवित १९८९ पर्यंत कार्यरत राहिले. याचवेळी त्यांनी पुणे विद्यापीठात 'आयुंका' (इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर एसट्रोनोमी) या खगोलशास्त्रातील प्रगत अध्ययन केंद्राची अथक परिश्रमातून उभारणी केली. खगोलशास्त्र व खगोलभौतिकी या विषयांचेही संस्था मार्गदर्शन करते. अंतराळातील ग्रह, तारे, नक्षत्रे यांची माहिती देण्यासाठी डॉ. नारळीकरांनी आकाशदर्शनाचे कार्यक्रम घडवून आणले. खगोलशास्त्रातील अनेक अद्ययावत उपकरणांनी सुसज्ज अशी प्रयोगशाळा तसेच अनेक दुर्मिळ ग्रंथ व अद्ययावत नियतकालिके येथे उपलब्ध आहेत. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार व्हावा म्हणून व्याख्यानमाला, कार्यशाळा, विद्यार्थ्यांची सुट्टीतील शिबिरे आदी उपक्रम आयुका राबविते.

१९६६ मध्ये मंगला सदाशिव राजवाडे या विदुषीने डॉ. नारळीकरांच्या आयुष्यात प्रवेश केला. मंगला ह्या मुंबई विद्यापीठाच्या गणित विषयातील पीएच. डी. प्राप्त केलेल्या बुद्धिमान युवती होत्या. गणित व संशोधन हे दोघांच्याही स्वारस्याचे विषय झाल्याने आयुष्याचे गणित अत्यंत सोपे झाले. दोघांचा संसार बहरला आणि त्या संसारवेलीवर गीता, गिरिजा आणि लीलावती ही तीन कन्यारत्ने उमलली. संसार बहरत असतानाच डॉ. नारळीकरांचे संशोधन कार्यही विस्तारत गेले.

**गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत :** डॉ. नारळीकरांचे जगभर गाजलेले संशोधन म्हणजे त्यांनी डॉ. हॉएल समवेत मांडलेला गुरुत्वाकर्षण सिद्धांत होय. वेग हा सापेक्ष आहे, याची जाणीव आईन्स्टाईनच्याही पूर्वी गेलिलिओ, न्यूटन, माख यांना होती. वेगाला अर्थ देणाऱ्या विशिष्ट पार्श्वभूमीवर न्यूटन, माख यांनी मते मांडली आहेत. न्यूटनच्या मते, ही पार्श्वभूमी म्हणजे निरपेक्ष अवकाश. मात्र तो याचे अस्तित्व सिद्ध करू शकला नाही. त्यामुळे निरपेक्ष अवकाशाची कल्पना खरी की खोटी यावर शास्त्रज्ञांमध्ये मतभेद होत राहिले. यावर ऑस्ट्रियन शास्त्रज्ञ माख याने उत्तर शोधले. बॅले नर्तिकेच्या उदाहरणाद्वारे विश्वात निरपेक्ष अवकाश असे काही नसते व ग्रहताऱ्यांचे वस्तुमानच गतिनिश्चितीस पार्श्वभूमी पुरवीत असल्याचा सिद्धांत माखने मांडला. मात्र माखला हे गणितीय पद्धतीने सिद्ध करता आले नाही. माखच्या सिद्धांताचे गणितीय विश्लेषण डॉ. नारळीकरांनी आपले गुरु डॉ. हॉएल यांच्या मार्गदर्शनाखाली केले. 'जर विश्वात एकच कण असेल तर त्याला वस्तुमान असणार नाही. पण आणखी एक दुसरा कण निर्माण झाला तर दोन्ही कण एकमेकांना वस्तुमान पुरवतील' हा त्यांनी यासंदर्भात मांडलेला सिद्धांत. या सिद्धांताच्या आधारे विश्वातील प्रत्येक वस्तूची निर्मिती व अंत सांगता येतो. त्यामुळे आईन्स्टाईनच्या सापेक्षतावादाच्या समीकरणांपेक्षा डॉ. नारळीकरांची समीकरणे प्रभावी ठरतात. या सिद्धांताचे गणितीय सूत्र इतके किचकट आहे की, १९६४ साली जेव्हा रॉयल सोसायटीच्या सभागृहात उपस्थित शास्त्रज्ञांसमोर मांडले तेव्हा फारच थोड्या जणांना त्याचे आकलन झाले. वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी हा ज्ञानाच्या क्षेत्रातील महान पराक्रम केल्याने डॉ. नारळीकरांची गणना जगातील थोर खगोलशास्त्रज्ञांमध्ये केली जाऊ लागली.

**स्थिरवत विश्वस्थितीचा सिद्धांत :** (Quasi Steady State Theory) विश्व हे एका मोठ्या स्फोटाने निर्माण झाले, असे अनेक शास्त्रज्ञांचे मत आहे. १९४८ साली बॉन्डी, गोल्ड व हॉएल यांनी स्थिर विश्वस्थितीचा सिद्धांत मांडला. तो असा, विश्व हे अनादी व अनंत आहे. अपरिवर्तनशील आहे. मोठ्या कालावधीचा विचार केला तर विश्व हे स्थिर असते. पण लहान कालावधीचा विचार करता त्याच्या घटकात बदल होत असतो. त्यानंतर डॉ. नारळीकर, हॉएल व बर्बीज यांनी नवा स्थिरवत विश्वस्थिती सिद्धांत मांडला. त्यानुसार मोठ्या कालावधीचा विचार केला तर विश्व हे सतत प्रसरण पावत असते. पण लहान कालावधीचा विचार करता विश्व हे सतत आकुंचन-प्रसरण पावत असते. डॉ. नारळीकरांच्या या सिद्धांताने महास्फोट सिद्धांताला मोठे आव्हान दिले आहे.

**विज्ञानविषयक साहित्य निर्मिती :** आयुका संस्थेमार्फत चालणाऱ्या अनेक प्रयोगांना डॉ. नारळीकर मार्गदर्शन करतात. 'अवकाशातील धुमकेतूच्या शेपटीमधून अनेक रोगजंतू पृथ्वीवर येतात' या हॉएल-विक्रमसिंह सिद्धांताला पुष्टी देणारा प्रयोग आयुकातर्फे केला गेला आहे. वैज्ञानिक सिद्धांतावर आधारित कथा लिहून त्यांनी विज्ञानाविषयी सर्वसामान्य माणसांमध्ये आवड निर्माण केली. 'आकाशाशी जडले नाते' ही ग्रंथरचना त्यांनी अत्यंत लालित्यपूर्ण भाषेत केली आहे. डॉ. नारळीकर हे अंधश्रद्धा निर्मूलनाचे खंदे पुरस्कर्ते आहेत. फलज्योतिष, पुराणकथांतील विज्ञानाच्या भाकडकथा आदी अंधश्रद्धा पसरविणाऱ्या गोष्टींवर त्यांनी आपल्या लिखाणातून टीका केली आहे. लेखन व व्याख्यान याद्वारे ते समाजाचे प्रबोधन करत असतात. विद्यापीठातून ज्योतिषशास्त्राचा अभ्यास सुरु करण्यास त्यांनी विरोध दर्शविला. त्यामुळे अंधश्रद्धेला उत्तेजन मिळेल असे त्यांचे मत होते.

केंब्रिजमध्ये शिकत असतानाच टायसन पदक, स्मिथ पारितोषिक, एडम्स पारितोषिक डॉ. नारळीकरांनी मिळविले. त्यांचा देश-विदेशात अनेक सन्मानांनी गौरव केला आहे. शांतीस्वरूप भटनागर पुरस्कार, बी. एम. बिर्ला पुरस्कार, फाय फौंडेशनचा राष्ट्रभूषण पुरस्कार, कोल्हापूरचा राजर्षी शाहू पुरस्कार, चतुरंग प्रतिष्ठानचा जीवनगौरव पुरस्कार आदी असंख्य पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. याशिवाय भारत सरकारने त्यांना पद्मभूषण (१९६५), पद्मविभूषण (२००४), पुरस्काराने तर राष्ट्रीय विज्ञान संस्थेने इंदिरा गांधी पुरस्काराने (१९९०) सन्मानित केले आहे. १९९६ मध्ये त्यांना युनोस्कोचा 'कलिंग पुरस्कार' तर २००४ मध्ये फ्रेंच सरकारचा खगोलशास्त्रातील जागतिक कीर्तीचा 'प्रिक्स जोन्सन' हा पुरस्कार प्रदान केला आहे. नुकतेच त्यांच्या सुविद्य पत्नी प्रख्यात गणितज्ज्ञ डॉ. मंगला नारळीकर यांचे दुःखद निधन झाल्याने त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो. त्यांना दीर्घायुष्य लाभो, हीच शुभेच्छा !

**-प्रा. विजय कोष्टी**
सहयोगी प्राध्यापक, सांख्यिकी विभाग
पी.व्ही.पी.महाविद्यालय,
कवठेमहांकाळ, जि. सांगली

# वाचनसंस्कृती आणि आजची पिढी

शहरात वा खेड्यात वास्तव्य करणाऱ्या बहुतेकांना कोणते ना कोणते मादक पदार्थ सेवन करण्याची सवय लागलेली आहे. त्यातच दारू, गांजा, तंबाखू, सिगारेट यांसारख्या शरीराला घातक असलेल्या पदार्थाचे सेवन अत्यंत घातक आहे. कालपरवा नांदेड जिल्ह्यातील खेड्यात वास्तव्य करणाऱ्या वृद्ध व्यक्तीचा फोन आला.त्यांनी तरुण व्यक्तीविषयी एक खंत व्यक्त केली की, आजचे तरुण व्यसनाच्या आहारी गेलेले आहेत त्यांना उद्बोधन होईल असं लेखन आपल्याकडून अपेक्षित असल्याचे सुचविण्यात आले. त्यामुळे या विषयावर लेखन करणे आवश्यक गरज बनली आहे हे मनात ठरवून लिहायला लागलो. वृद्ध व्यक्तीने मादक पदार्थ वा चाय पिण्यापेक्षा वर्तमानपत्र विकत घेऊन वाचन संस्कृती रुजवत असल्याने मला अत्यंत आनंद झाला. आज सोशल मीडियाचा युग आला असल्याने वाचन संस्कृतीपासून तरुण-तरुणी दुरावत असल्याचे चित्र दिसून येते. जुनी पिढी अजूनही ऑफलाईन दुनियेच्या वस्तुस्थितीत व व्यसनाच्या दूर राहून जीवन व्यतीत करीत असल्याचे दिसून येते.

कामगार, मजूर, शेतमजूर शारीरिक कष्ट करून सायंकाळी नशेच्या आहारी जात असल्याचे दिसून येत आहे. शारीरिक कष्ट करणारी व्यक्ती जास्तीत जास्त दारूच्या नशेत पैशाचा अपव्यय करीत असल्याने त्यांच्या संसारावर विपरीत परिणाम होत आहे. दारू पिणाऱ्या व्यक्तीला त्याचा दुष्परिणाम लक्षात येत नसला तरी कौटुंबिक व सामाजिक परिणाम अतिप्रमाणात होत असल्याने आई-वडील, पत्नी, मुले यांच्याकडे दुर्लक्ष होत आहे, म्हणून मादक पदार्थाचे सेवन करण्याऐवजी मुला-बाळांना तेवढ्याच पैशाचे खाऊ घेऊन गेल्यास घरी मुले खुश होतील. त्यामुळे संसारावर येणारा ताण दूर सारण्यासाठी दारूचे सेवन करणे टाळायला हवे. दारू, गांज्या यामुळे समाजजीवनावर होणारे परिणाम टाळण्यासाठी व संसार जोडण्यासाठी दारू सोडा, संसार जोडा असे सांगण्याची गरज निर्माण झाली आहे.

जीवनजगतअसतानाबऱ्याचदासण, समारंभ, आनंद अशा वेळी दारूचे सेवन केले जाते. मित्राच्या सहवासात असताना एकमेकांच्या आग्रहाने आनंद व्यक्त करण्याच्या नादात एकच प्याला म्हणून घेतलेला घातक ठरत असतो. हळूहळू शरीराला त्याची सवय होत जाते. दारू, गांज्या यांसारख्या मादक पदार्थामुळे नशा येऊन त्याचा यकृतावर परिणाम जाणवू लागतो.ही एक प्रकारची लत असून प्रथमतः आपण दारूला पीत असतो नंतर संपूर्ण शरीर अल्कोहोलिक होऊन शरीरच दारूची मागणी करीत असल्याने मादक पदार्थापासून दूर जाणे अवघड होते. तरीदेखील दारूपासून मुक्ती मिळविणे अशक्य नाही, कारण दारूचे सेवन करणे व वर्ज करणे अखेर स्वतःच्या मनावर अवलंबून असते. दारूचे सेवन करीत असल्याने दिवसभर काम केल्यावर आलेल्या पैशाचा संसारासाठी वापर न करता दारूच्या पाण्यापायी पैशाची उधळण करीत असतो. त्यामुळे कित्येक संसार उघड्यावर पडलेले असून त्यांचे कुटुंबातील सदस्य उपाशी झोपतात. असे कितीतरी कुटुंब त्यांच्या एका व्यक्तीच्या दारू पिण्यामुळे मुलं देखील वाईट व्यसनाकडे वळलेले आहेत. त्यामुळे गुन्हेगारी, चोरी, खून यांसारख्या वाईट गोष्टींकडे वळलेले आहेत. तसेच वडील दारूच्या नशेत असल्याने शिक्षण अर्धवट सोडून बालमजुरी करावी लागत असल्याचे विचित्र चित्र दिसत असल्याने दारू सोडा...संसार जोडा असं आर्जवपणे म्हणावे लागते आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील झेप ही व्यसनमुक्ती संघटना कार्यरत आहेत. तसेच शेषराव महाराज व्यसनमुक्ती संघटना आज संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत आहेत. म्हणून आपल्या आजूबाजूच्या परिसरात दारूचे व्यसन करणाऱ्या व्यक्तीला व्यसनमुक्ती संघटनेत नेऊन सुखी संसार करण्यासाठी प्रत्येकांनी पुढाकार घ्यायला हवा.

कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईट असतो हे सर्वांना ज्ञात आहे, म्हणूनच म्हटले जाते की, अति तिथे माती ही म्हण त्याठिकाणी चपखल बसू शकते. माझ्या गावाला तसेच अवतीभवती चोवीस तास नशेच्या आहारी राहणारे व्यक्ती देखील दारूपासून दूर झालेले आहे आणि संसाररूपी रथ सुंदररित्या सांभाळत आहेत त्यामुळे त्यांना मार्ग दाखविणारे गुरू मिळाले अन्यथा त्यांची अंतिम प्रेतयात्राच निघाली असती हे सत्य आहे. म्हणून अशी स्थिती येऊ नये, तरुणपणात जग सोडून जाणे म्हणजे पत्नीला विधवा व मुलांना अनाथ करून सोडणे होय. या पृथ्वीवर जन्माला आल्यानंतर सत्कार्य करण्याचे सौभाग्य प्रत्येकाला लाभायला हवे. यासाठी दारू या विषयुक्त नशेच्या आहारी न जाता कुटुंबाच्या प्रेमात, आपुलकीत, स्नेहात राहून कुटुंब ही संकल्पना मनात रुजवायला हवी.आज कित्येक जण नशेच्या आहारी आहेत, पण यात कोणाचेही नाव लिहिणे हे उचित वाटत नाही. प्रत्येकांनी दारूचे व्यसन न करता चांगल्या कार्याचे, गोष्टीचे व्यसन करण्यास प्रोत्साहित करायला हवे. स्वतःसाठी जगता जगता इतरांसाठी जगण्याचा कानमंत्र हाती घ्यायला हवा.गावातील तरुण एकत्र येऊन व्यसनमुक्ती संघटना स्थापन करून व्यसन करणाऱ्या व्यक्तीवर अंकुश ठेवायला हवा. गावातील कुटुंब आनंदी तर गाव आनंदी आणि गाव आनंदी तर तालुका, जिल्हा, राज्य, देश आनंदी होईल आणि दारू सोडा...संसार जोडा ही संकल्पना विस्ताराला चालना मिळेल.

**-दुशांत बाबुराव निमकर**
शब्दांकुर फाऊंडेशन,
गोंडपिपरी
मो. ९७६५५४८९४९

## थोडक्यात...

### जीव धोक्यात घालून वीज दुरूस्तीची कामे न करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** ग्रामीण भागात वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर किंवा काही तांत्रिक बिघाडानंतर नागरिकांकडून आपला जीव धोक्यात घालून वीज यंत्रणेच्या दुरुस्तीची किंवा फ्यूज टाकण्यासारखी कामे करण्यात येत असतात, अशी कामे परस्पर न करण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

कुठे वीज पुरवठा खंडित झाला असेल किंवा तांत्रिक बिघाड झाला असेल, तर त्या बाबतची माहिती कार्यालयास तसेच महावितरणच्या टोल फ्री क्रमांकावर कळवावी, तक्रार नोंदवावी. ग्राहक तक्रारीसाठी १९१२, १८००२१२३४३५ व १८००२३३३४३५ या टोल फ्री क्रमांकासह नांदेड येथील ७८७५४७३९८०, परभणीसाठी ७८७५४७६३२६ तर हिंगोली जिल्ह्यातील नागरिकांनी ७८७५४४७१४३ या क्रमांकावर डीएसएस कंट्रोल रुमशी संपर्क साधून तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### नॅशनल स्कॉलर सर्च एक्झामेनिशमध्ये समीक्षा सावळेचे यश

**लोहा (प्रतिनिधी)–** नॅशनल स्कॉलर सर्च एक्झामेनिशन मध्ये समिक्षा सावळे या विद्यार्थिनीनी घवघवीत यश संपादन केले आहे. ही राज्यपातळीवर स्पर्धात्मक परीक्षा जानेवारी २०२५ मध्ये आयोजित करण्यात आली होती.



सदरील स्पर्धात्मक परीक्षा मध्ये नांदेड जिल्ह्यातून अनेक विद्यार्थी बसले होते. त्यामध्ये इयत्ता पाचवीमधील समीक्षा प्रसेनजीत सावळे या विद्यार्थिनीने ८० टक्के मार्क घेऊन घवघवीत यश संपादित केले आहे. सदरच्या यशाबद्दल तिचे तिचे गुरुजन व पालक इत्यादीने कौतुक करून बक्षिसांचा वर्षाव केला आहे.

# जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या हस्ते कुरुंदकर स्मारक बांधकामाच्या दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ




**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून नरहर कुरुंदकर स्मारक बांधकामाच्या दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते झाला. गेल्यावर्षी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते स्मारक बांधकामाच्या दुसऱ्या टप्प्याचे भूमिपूजन झाले होते.

शुभारंभाच्या कार्यक्रमात बोलताना कर्डिले यांनी महाराष्ट्राच्या विचारविश्वातील प्रा. कुरुंदकर यांचे स्थान अधोरेखित केले. तसेच नांदेड जिल्ह्याचा समृद्ध वारसा जतन करण्याची गरज आहे,असे सांगितले. याप्रसंगी बांधकाम विभागाचे अधिकारी नाईक आणि बोकारे, तसेच दुसऱ्या टप्प्याच्या बांधकामाचे कंत्राटदार विशाल पाटील यांचा नरहर कुरुंदकर प्रतिष्ठानच्यावतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी इतिहासतज्ञ प्रा. आशुतोष पाटील, प्रतिष्ठानच्या अध्यक्ष प्रा. सौ. श्यामल पत्की, प्रतिष्ठानचे इतर विश्वस्त ज्येष्ठ साहित्यिक प्रा. दत्ता भगत, श्री. दीपनाथ पत्की, प्रा. मधुकर राहेगावकर, डॉ.श्रीनिवास पांडे, लक्ष्मण संगेवार, डॉ. विश्वाधार देशमुख, आणि डॉ. अभय दातार यांच्यासह ज्येष्ठ व्यावसायिक अलीभाई पंजवानी, पीपल्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. एम. जाधव, ज्येष्ठ साहित्यिक मधुकर धर्मापुरीकर, प्रा. रणजीत धर्मापुरीकर, डॉ. विकास सुकाळे, डॉ. मोहन रोडे, डॉ. विनायक देव आदी मान्यवर उपस्थित होते.

## किनवट पालिकेत थेट नगराध्यक्षांसह २२ नगरसेवक राहणार

**किनवट (प्रतिनिधी)–** येथील नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीची अधिसूचना विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी जारी केली आहे. त्यानुसार किनवट पालिकेत थेट जनतेतून निवडून येणाऱ्या नगराध्यक्षांसह २२ नगरसेवक पालिकेत असणार आहेत.



किनवट पालिकेच्या पदाधिकाऱ्यांची पंचवार्षिक मुदत अडीच वर्षांपूर्वी संपली. निवडणूक लवकर लागून आपण निवडून यावे, यासाठी भावी नगराध्यक्ष व नगरसेवकांनी देव पाण्यात ठेवले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने आता पालिका निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला असून त्यादृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. किनवट पालिका निवडणुकीची अधिसूचना जाहीर झाली असून या निवडणुकीसाठी दि.१ जुलै २०२५ पर्यंतची मतदारयादी ग्राह्य धरावी, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले आहेत. किनवट पालिकेसाठी सन २०११ च्या जनगणनेनुसार २८ हजार ४५४ मतदार आहेत. यात ३५९० अनुसूचित जाती, तर १८४४ अनुसूचित जमातीचे मतदार आहेत. दि.१ जुलैपर्यंतची यादी ग्राह्य धरण्यात येणार असल्याने एकूण मतदारसंख्येत वाढ होणार आहे. नवीन प्रभाग रचनेनुसार अनुसूचित जाती पुरुष ३, महिला २, अनुसूचित जमाती पुरूष १, महिला ०, नागरिकांचा मागासप्रवर्ग पुरूष ३, महिला ३, सर्वसाधारण पुरुष ५ तर ६ महिलांचा समावेश आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून दि.२६ ते ३० सप्टेंबरपर्यंत अंतिम प्रभाग रचना अंतिम होणार आहे. त्यानंतर संबंधित मुख्याधिकारी अंतिम प्रभागरचना प्रसिद्ध करणार आहेत. अंतिम प्रभागरचना व थेट नगराध्यक्षाचे आरक्षण कोणत्या प्रवर्गासाठी सुटेल, त्यानंतरच खरी रंगत येणार आहे.

## मारतळा येथे भरधाव दुचाकी घसरली, दोघेजण जखमी

**नांदेड (प्रतिनिधी)–** मारतळा परिसरात जोरदार पाऊस सुरू असताना दुचाकी स्लीप होऊन दोघेजण गंभीर जखमी झाल्याची घटना दि. १८ जुलै रोजी दुपारी ३ वाजेच्या दरम्यान घडली.

नांदेड-हैदराबाद महामार्गावर शुक्रवार, दि. १८ जुलै रोजी दुपारी मारतळा व परिसरात जोराचा पाऊस सुरू होता. यावेळी गाडी क्र. एम.एच. २६ बी.एन. ००८९ या दुचाकीवर बसून शिवाजी काळबा मोरे (वय ३९) व शेषराव माधव विभुते (वय २९) हे दोघेजण नांदेड येथील काम आटोपून आपल्या गावाकडे निघाले होते. यावेळी पावसामुळे गाडी स्लीप होऊन दोघेजण गंभीर जखमी झाली.

घटनेची माहिती मिळताच सहायक वाहन निरीक्षक अक्षय काळे हे घटनास्थळी दाखल झाले व त्यांनी १०८ रूग्णवाहिकेला पाचारण करून जखमींना पुढील उपचारासाठी नांदेड येथील शासकीय रूग्णलयात पाठविले. जखमींना अवघ्या २५ मिनीटांत रूग्णालयात दाखल केल्याने त्यांचा जीव वाचला असल्याचे बोलले जात आहे.

## ग्यान माता विद्या विहार शाळेच्या फुटबॉल संघाने सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या वतीने पीपल्स कॉलेजच्या मैदानावर ७ व ८ जुलै २०२५ रोजी जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. ग्यान माता विद्या विहार शाळेच्या संघाने सहभाग नोंदवीत स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले आहे. लातूर येथे होणाऱ्या आंतरजिल्हा सुब्रतो मुखर्जी विभागीय फुटबॉल स्पर्धेत नांदेड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व ग्यान माता शाळा करणार आहे.

ग्यान माता विद्या विहार शाळेने बाद फेरीच्या सामन्यांमध्ये ५-० गोलच्या फरकाने विजय संपादन केला आहे. अंतिम फेरीत सना इंटरनॅशनल स्कूल नांदेडच्या संघावर ५-१ अशा फरकाने मात देवून विजय नोंदवीत स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले.

दि. २० जुलै २०२५ रोजी लातूर येथे होणाऱ्या विभागीय फुटबॉल स्पर्धेसाठी शाळेचे प्राचार्य फादर ईग्नाथी, उपप्राचार्य फादर ॲनसन, शाळेचे अधीक्षक फादर आनंद, सिस्टर्स, क्रीडा शिक्षक विष्णू शिंदे, फेलिक्स पिल्ले, अलेक्स, सौ. श्वेता ठाकूर, सौ. यदुकृष्णा, शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शाळेच्या संघाला शुभेच्छा दिल्या.

## जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांनी देशाबाहेरील अभ्यास दौऱ्यात भाग घ्यावा

### जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तकुमार कळसाईत

**नांदेड (प्रतिनिधी)–** कृषी विभागामार्फत जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांसाठी देशाबाहेरील अभ्यास दौरे सन २०२५-२६ ही योजना राबविण्यात येत आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी या परदेश अभ्यास दौऱ्यासाठी ३० जुलै २०२५ पूर्वी संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयात अर्ज करावेत. तसेच अर्ज केलेले शेतकरी यांनी ४ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, नांदेड येथे दुपारी २ वाजता उपस्थित रहावे. प्राप्त अर्जातून जिल्हास्तरीय समितीसमोर सोडत काढण्यात येणार असून यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

या आर्थिक वर्षात जिल्हास्तरावरून निवड करताना प्रति जिल्हा किमान १ महिला शेतकऱ्याची व किमान १ राज्य तथा केंद्रीय शासन स्तरावरील विविध कृषी पुरस्कार प्राप्त व पीकस्पर्धा विजेते शेतकरी असे एकूण पाच शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे. विविध देशांनी विकसित केलेले शेती तंत्रज्ञान व अनुषंगिक बाबी यांची माहिती त्यादेशातील शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा करून तसेच क्षेत्रीय भेटी, संबंधित संस्थाना भेटी इत्यादीद्वारे शेतकऱ्यांचे ज्ञान आणि क्षमता उंचावण्याकरिता कृषी विभागाकडून राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यासदौरे सन २०२५-२६ ही योजना राबविण्यात येत आहे.

शेतकरी शासकीय, निमशासकीय, सहकारी, खाजगी संस्थेत नोकरीस नसावा. वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर, वकील, सीए, अभियंता, कंत्राटदार नसावा तसे त्याने स्वतः स्वयंघोषणापत्रात नमूद करावे, शासनाकडून अभ्यास दौऱ्यासाठी सर्व घटकातील (संवर्गातील) शेतकऱ्यांना एकूण खर्चाच्या ५० टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त १ लाख रुपये यापैकी कमी असेल ती रक्कम अनुदान म्हणून देय आहे. सन २०२५-२६ मध्ये खालील प्रमाणे शेतीचे वैशिष्ठे, दिवस कंसात देश / देशाचा गट देण्यात आले आहे. फलोत्पादन, सेंद्रियशेती आणि दुग्धोत्पादन- दौरा १२ दिवस- (युरोप - नेदरलँड्स, जर्मनी, स्वित्झर्लंड, फ्रान्स). आधुनिक कृषी तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन व कृषीयांत्रिकीकरण - दौरा ९ दिवस- (इस्राईल). सेंद्रिय शेती व आधुनिक कृषी तंत्रज्ञान- दौरा १० दिवस- (जपान). फळे व भाजीपाला पिकांचे काढणी पश्चात तंत्रज्ञान (Post-Harvest Technolog) आणि व्यवस्थापन प्रणाली- दौरा १२ दिवस (मलेशिया, व्हिएतनाम व फिलीपाइन्स). विविध कृषी तंत्रज्ञान, पीक उत्पादकता वाढवण्यासाठी लागणारे तंत्रज्ञान आणि कृषी एक्पो दौरा ८ दिवस (चीन). आधुनिक कृषी अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान दौरा ८ दिवस (दक्षिण कोरिया) याप्रमाणे दौरे नियोजित असून इच्छुक व पात्र शेतकऱ्यांनी विहित वेळेत ३० जुलै २०२५ पूर्वी संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयात अर्ज करावेत असे कृषी विभागाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## सनराईज राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेचे पारितोषिक वितरण उत्साहात

**नांदेड (प्रतिनिधी)–** डॉ. शंकरराव चव्हाण जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या १९ वर्षाच्या आतील वयोगटातील योनैक्स राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेच्या विजेत्यांना आज मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. युतिका चव्हाण, सर्वेश यादव, श्रावणी वालेकर, अर्जुन रेड्डी, बिराजदार बंधू, गाथा सूर्यवंशी, प्रांजल शिंदे ठरले विजयाचे मानकरी ठरले.




यशवंत महाविद्यालयाच्या क्रीडा संकुलात पार पडलेल्या २१ व्या राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेला दि. १४ जुलै रोजी सुरूवात झाली होती. राज्यातील २८ शहरांतून २५० हून अधिक बॅडमिंटनपटूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. प्रत्येक सामना अत्यंत चुरशीचा झाला. शुक्रवारी सकाळी ८ वाजता अंतिम लढतीसाठी सामन्यांना सुरूवात झाली होती. अत्यंत अटीतटीच्या अंतिम सामन्यात मुलींच्या एकेरी सामन्यात पुण्याची युतिका चव्हाण हिने नागपूरच्या रिधिमा सरपातेवर विजय मिळविला. मिक्स गटातून ठाण्याच्या सर्वेश यादव आणि नाशिक श्रावणी वालेकर यांनी पालघरच्या निधिष मोरे आणि प्रांजल शिंदे यांचा पराभव करीत विजयावर शिक्कामोर्तब केले. मुलांच्या सिंगल गटातून मुंबईच्या अर्जुन रेड्डी यांनी मुंबईच्याच आर्यन तलवार याच्यावर विजय मिळविला. मुलांच्या दुहेरी सामन्यात ठाण्याच्या अर्जुन बिराजदार आणि आर्यन बिराजदार या बिराजदार बंधूंनी ठाण्याच्या ओम गावंडी आणि सानिध्या एकडे यांचा पराभव केला. मुलींच्या दुहेरी सामन्यात बोरिवलीची गाथा सूर्यवंशी आणि पालघरच्या प्रांजल शिंदे यांनी ठाण्याची आदिती गावडे, पुण्याची युतिका चव्हाण यांचा पराभव करीत जेतेपद पटकाविले.

विजेत्यांना आज दुपारी १२.३० वाजता माजी मंत्री तथा नांदेड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष डी.पी. सावंत, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, सचिव महेश वाकरडकर, संघटनचे उपाध्यक्ष बी.के. मोहन, सदस्य रवी कडगे यांच्या उपस्थितीत पारितोषिकांनी गौरविण्यात आले. पुरस्कार वितरण सोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ. अश्विन बोरीकर यांनी केले. स्पर्धा यशस्वी करणाऱ्या पंच डॉक्टर आणि विविध समित्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार केला.

दरम्यान, गेल्या २१ वर्षांपासून सुरू असलेली ही स्पर्धा मराठवाड्याच्या बॅडमिंटन या क्रीडा प्रकाराला नव्या शिखरावर नेणारी आहे. या स्पर्धेतून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू घडतील, यासाठी पालकांनी आपल्या मुलांचे प्रशिक्षक होऊन पुढे येणे गरजेचे असल्याचे मत प्रमुख पाहुणे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष माजी मंत्री डी.पी. सावंत, निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांचीही समयोचित भाषणे झाली.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृती दिनानिमित्त सिडको येथे अभिवादन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृती दिनानिमित्त विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकारी यांच्यासह समाज बांधव, पत्रकार यांच्यावतीने सिडको येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मृती दिनानिमित्त दि. १८ जुलै रोजी सकाळी सिडको येथील अण्णाभाऊ साठे सभागृह येथे अर्धाकृती पुतळ्यास मनपाच्या भाजपा नगरसेविका सौ.बेबीताई गुपीले, छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा पुरस्कार प्राप्त जनार्दन गुपीले, साहित्यिक गंगाधर वाघमारे, सेवानिवृत्त अधिकारी उत्तम घोडेकर, दलित मित्र तथा सेवानिवृत्त अधिकारी आर.जे.वाघमारे, दलित मित्र नारायण कौलंबीकर, माधव आंबटवार, सेवानिवृत्त अधिकारी शंकर धिरडीकर, आनंदराव गायकवाड, शाहीर गौतम पवार भुकमारीकर, उद्योजक माधव डोम्पले, जयंती मंडळ अध्यक्ष नितीन वाघमारे, पप्पू गायकवाड, एकनाथ वाघमारे, राजू लांडगे, सुरेश कांबळे, विलास गजभारे, विठ्ठल घाटे, ॲड.प्रेसनजित वाघमारे, विशाल गंडबे, केशव कांबळे, डॉ.राहुल वाघमारे, अंबादास मेकाले, सुजित निळकंठे, गोकुळ वाघमारे, कोकरे, आनंदा वाघमारे, बा.रा.वाघमारे, बालाजी वाघमारे, निवृत्ती गायकवाड, अंकुश गायकवाड, सचिन रावका, विठ्ठल गायकवाड, अमृत नरगंलकर, साहेबराव भंडारे आदींनी अभिवादन केले.

## राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अभियंता सेलच्या जिल्हाध्यक्षपदी बालाजी पाटील कदम



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नांदेड जिल्हा अभियंता सेलच्या जिल्हाध्यक्षपदी इंजि. बालाजी भानुदास पाटील कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

ही निवड राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते तथा आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी ज्येष्ठ नेते भास्करराव पाटील खतगावकर यांच्या उपस्थित आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत केली.

यावेळी माजी आ.मोहनराव हंबर्डे, प्रदेश उपाध्यक्ष व्यंकट पाटील गोजेगावकर, प्रदेश सरचिटणीस दिलीपराव पाटील धर्माधिकारी, माजी आ.अविनाश घाटे, नांदेड शहर जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश पोकर्णा, दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, उत्तरचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावनगावकर, प्रदेश उपाध्यक्ष सौ. मीनलताई खतगावकर, प्रदेश सरचिटणीस वसंत पाटील सुगावे, शिवाजीराव धर्माधिकारी यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## हृदय रोगाशी संबंधित आजार असलेल्या ९५ बालकांची टुडी ईको तपासणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत आयोजित शिबिरात हृदयाचे आजार असलेल्या बालकांची २ डी इको तपासणी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रुग्णालय नांदेड येथे नुकतीच करण्यात आली. या शिबिरात नांदेड जिल्ह्यातील एकूण ९५ बालकांची तपासणी करण्यात आली असून बालाजी हॉस्पिटल मुंबई येथे मोफत हृदय शस्त्रक्रियेसाठी पात्र एकूण २४ बालकांची शस्त्रक्रिया ऑगस्ट महिन्यात करण्यात येणार आहे.



या शिबिरासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चंद्रशेखर अप्पनगिरे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे यांच्या नेवृत्वात्वाखाली हृदयाचे आजार असलेल्या सदृश्य बालकांची २ डी इको तपासणी करण्यात आली. ही तपासणी बालाजी रुग्णालय, मुंबई येथील लहान मुलांचे हृदयरोग तज्ञ डॉ. जयश्री मिश्रा आणि रुग्णालयाचे व्यवस्थापक प्रतिक मिश्रा ह्या विशेषज्ञांच्या मार्फत पार पडले.

राज्यात शालेय आरोग्य तपासणी हा कार्यक्रम यशस्वी ठरल्यामुळे व कुपोषणाचा प्रश्न गंभीर असल्यामुळे आणि बाल मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने नांदेड जिल्ह्यातील ४५ आरोग्य पथकांद्वारे वर्षातून २ वेळा अंगणवाडीतील व १ वेळा शाळेतील बालकांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात येत आहे. शुन्य ते १८ या वयोगटातील बालाकंची ४ डी म्हणजे जन्मतः व्यंग, पोषणमुल्यांची कमतरता, शाररीक व मानसिक विकासात्मक विलंब, आजार यांचे निदान व उपचार करण्यात येतात.

हृदयरोग तपासणी, नेत्ररोग, आकडी/फेफरे यांची मोठ्याप्रमावर शिबिरे आयोजित करून निदान व औषधोपचार करण्यात येते. जिल्ह्यातील अनेक मुला-मुलींना या कार्यक्रमांचा मोफत लाभ झालेला असून त्यात अनेक जणांवर हृदय शस्त्रक्रिया व इतर शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.

## मोताबाई राठोड यांचे निधन

**लोहा(प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील माळाकोळी (विठोबा तांडा) येथील ज्येष्ठ महिला मोताबाई धेना राठोड यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी शुक्रवार, दि. १८ जुलै रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी दुपारी १ वाजता विठोबा तांडा येथील त्यांच्या शेतात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. कै. मोताबाई धेनू राठोड यांच्या पश्चात साहेबराव धेनू राठोड व शामराव धेनू राठोड ही दोन मुले, पाच मुली, नातू, पणतू असा परिवार असून, त्या लोहा येथील जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपविभागीय शिवाजी राठोड यांच्या काकू (चुलती) होत.

## लेंडी धरणातील उर्वरित प्रकल्पग्रस्तांना स्वेच्छा पुनर्वसन मावेजा तात्काळ देण्याची मागणी

**मुक्रमाबाद (प्रतिनिधी)–** मुक्रमाबाद येथील लेंडी धरणातील उर्वरित प्रकल्पग्रस्तांना स्वेच्छा पुनर्वसन मावेजा व प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र तात्काळ देण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्याकडे शिवसेना ठाकरे गटाचे मुखेड विधानसभा प्रमुख मन्मथ खंकरे यांच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मुखेड तालुक्यातील गोणेगाव येथे गेल्या ४० वर्षापासून आंतरराची लेंडी धरण होऊ घातले आहे. लेंडी धरण पूर्णत्वाकडे आले असतानाही लेंडी धरणातील संपादीत बारा गावातील प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न प्रलंबित असतानाही लेंडी विभाग शेवटच्या टप्प्यातील गळभरणीच्या कामाला गती देऊन धरणग्रस्तांची घोर निराशा केली आहे. मुक्रमाबाद येथील १६० वर मूळ बाधित कुटुंबाचे स्वेच्छा पुनर्वसनाच्या मावेजा गत एक वर्षापासून निधी उपलब्ध असताना हेतू पुरस्काराने शासनाने थांबून ठेवला आहे. तसेच मुळ बाधित कुटुंबातील सुशिक्षित तरुणांना आजतागायत पर्यंत प्रकल्पग्रस्ताचे प्रमाणपत्र न दिल्याने बेरोजगार राहिले आहेत. यामुळे शासनाने वरील दोन्ही प्रलंबित प्रश्ने तात्काळ मार्गी लावावेत. याबरोबर २१ वर्षांच्या वरील विवाहित तरुणांना वाढीव कुटुंबाना स्वेच्छा पुनर्वसनासाच्या मावेजाचा लाभ शासनाने देत आहे. पण ज्या तरुणांचे २१ वर्षाच्या वर वय होऊन देखील कांही कारणांमुळे त्यांचे विवाह न झाल्यामुळे ते वाढीव कुटुंबाच्या मावेजा पासून वंचित ठेवून घोर अन्याय करीत असल्यामुळे शासनाने ही जाचक अट शिथिल करून सरसकट २१ वर्षाच्या वरील अविवाहित तरुणांना स्वेच्छा पुनर्वसनाच्या मावेजाचा लाभ देण्यात यावा, आदी मागण्या निवेदनाद्वारे खंकरे यांनी केल्या आहेत.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# ChatGPT Agent म्हणजे काय?

## तुमच्या जागी तुमचे काम कसे करेल, वापरापासून ते वैशिष्ट्यांपर्यंत जाणून घ्या

**ओपन एआयने एक नवीन ChatGPT AI टूल ChatGPT Agent सादर केले आहे. त्याच्या नावावरूनच असे सूचित होते की ते वापरकर्त्यांसाठी एजंटसारखे काम करेल. वापरकर्ते त्यातून त्यांचे काम करू शकतात. हो, चॅटजीपीटी आता वापरकर्त्यांसाठी त्यांच्या संगणकाचा वापर करून काम करू शकते. ते तुमची अनेक कामे पूर्ण करू शकते. वापरकर्ते चॅटजीपीटी एजंटला त्यांचे कॅलेंडर पाहण्यास आणि येणाऱ्या कार्यक्रमांबद्दल माहिती देण्यास सांगू शकतात. इतकेच नाही तर, जर तुम्हाला रेसिपी बनवायची असेल, तर त्यात आवश्यक असलेले घटक स्वतः ऑर्डर करण्याची आवश्यकता नाही. तुम्ही चॅटजीपीटी एजंट टूल वापरून चॅटबॉटला रेसिपीमध्ये आवश्यक असलेले घटक ऑर्डर करण्यास सांगू शकता. याचा अर्थ असा की तुम्ही तुमच्या एआय एजंटकडून तुमच्या जागी अनेक कामे करून घेऊ शकता. चला त्याच्या वापराबद्दल तपशीलवार जाणून घेऊया...**

### चॅटजीपीटी एजंट म्हणजे काय?

ही चॅटजीपीटीची नवीन एजंटिक प्रणाली आहे, जी वापरकर्त्यांसाठी खूप उपयुक्त ठरेल. ओपनएआयच्या ब्लॉग पोस्टनुसार, जेव्हा तुम्ही एजंटला काहीही करण्यास सांगता तेव्हा चॅटजीपीटी बुद्धिमत्तेने वेबसाइट्स सर्च करेल, निकाल फिल्टर करेल आणि आवश्यक असल्यास सुरक्षितपणे लॉग इन करण्यास सांगेल. इतकेच नाही तर ते विश्लेषण करेल आणि स्लाइडशोसह एक स्प्रेडशीट देखील देईल, जे तुम्ही संपादित करू शकाल.




### तुम्ही ते कसे वापरू शकाल?

आम्ही तुम्हाला सांगतो की प्रो, प्लस आणि टीम वापरकर्ते आजपासून म्हणजे १८ जुलै २०२५ पासून कधीही कोणत्याही संभाषणात एजंट मोड वापरू शकतात. यासाठी, मोड निवडावा लागेल. कंपोझरवर जाऊन टूल ड्रॉपडाउन आयकॉनवर क्लिक करून तुम्हाला हा मोड मिळेल. तुम्ही ड्रॉपडाउन मेनूमध्ये ChatGPT चे नवीन एजंट टूल ॲक्सेस करू शकाल. त्यानंतर तुम्हाला फक्त तुमच्या कामाबद्दल सांगावे लागेल, मग ते सखोल संशोधन असो किंवा स्लाइडशो बनवणे असो. एजंट काम करायला लागताच त्याची माहिती तुमच्या स्क्रीनवर दिसेल. याद्वारे तुम्हाला ChatGPT काय करत आहे हे कळेल. तुम्ही कधीही ब्राउझर थांबवू शकता आणि तुमच्या हातात नियंत्रण घेऊ शकता.

### तुमच्यासाठी हे काम करेल...

चॅटजीपीटीच्या मते, हे एक शक्तिशाली साधन आहे. तथापि, येणाऱ्या काळात त्यात आणखी सुधारणा केल्या जातील. चॅटजीपीटी एजंटमध्ये अनेक साधने देखील उपलब्ध आहेत. यात एक व्हिज्युअल ब्राउझर आहे, जो वेबसोबत ग्राफिकल यूजर इंटरफेसद्वारे संवाद साधतो. याशिवाय, एक टेक्स्ट-आधारित ब्राउझर देखील आहे. या सर्वांच्या मदतीने, चॅटजीपीटी एजंट वेबसाइटशी कनेक्ट होईल. बटणांवर क्लिक करणे, सामग्री फिल्टर करणे आणि फक्त आवश्यक माहिती गोळा करणे यासारख्या गोष्टी करू शकतो.

### स्वतःचा व्हर्च्युअल संगणक वापरेल

चॅटजीपीटी यासाठी स्वतःचा व्हर्च्युअल संगणक वापरतो. वापरकर्त्यांनी दिलेल्या सूचनांच्या आधारे, ते सुरुवातीपासून शेवटपर्यंत कठीण कार्यप्रवाह हाताळण्यासाठी तर्क आणि कृतीमध्ये सहजपणे बदल करते. त्याची खासियत अशी आहे की वापरकर्त्याकडे नेहमीच नियंत्रण असते. कोणतेही महत्त्वाचे काम करण्यापूर्वी ChatGPT वापरकर्त्याची परवानगी मागेल. तुम्ही केव्हाही त्याद्वारे केलेले काम थांबवू शकता.



# लॅपटॉप पावसात भिजला...

## जर या गोष्टी लक्षात ठेवल्या असत्या तर नुकसान झाले नसते!

**पावसाळ्यात सर्वांना प्रवास करायला आणि स्वादिष्ट अन्न खाण्यास आवडते, परंतु या हंगामात गॅझेटसाठी धोका निर्माण होतो. अलीकडेच एका प्रसिद्ध कंपनीत काम करणाऱ्या स्वातीने (नाव बदलले आहे) पाऊस तिच्यासाठी कसा त्रासदायक ठरला, हे सांगितले. एके दिवशी ती ऑफिसमधून घरी जात होती आणि वाटेत मुसळधार पाऊस सुरू झाला. पावसापासून वाचण्यासाठी कुठेही जागा नव्हती. तिच्याकडे एक बॅग होती, ज्यामध्ये तिच्या वैयक्तिक सामानासह, ऑफिसने तिला दिलेला लॅपटॉपदेखील ठेवण्यात आला होता. स्वातीला काळजी होती की पावसाच्या पाण्यामुळे लॅपटॉप खराब होणार नाही. घरी पोहोचल्यानंतर तिने लॅपटॉप तपासला तेव्हा जे झाले ते तिच्यासाठी धक्कादायक होते... अशा परिस्थितीत अडकल्यास काय करावे यासाठी आम्ही टिप्स दिल्या आहेत.**





- लॅपटॉप ठीक होता का? : स्वातीने सांगितले की जेव्हा ती पावसात थोडीशी भिजून घरी पोहोचली तेव्हा तिने पहिले बॅग उघडली आणि लॅपटॉप बाहेर काढला. लॅपटॉप बाहेर काढताच तिला दिसले की तो थोडासा ओला होता. लॅपटॉपवर पाण्याचे काही थेंब किंवा ओलावा होता. तिने ताबडतोब कोरड्या कापडाने लॅपटॉप पूर्णपणे स्वच्छ केला आणि पंख्याखाली ठेवला. तिला वाटले की लॅपटॉप ठीक होईल.
- ही चूक झाली... : काही वेळाने तिने लॅपटॉप चालू केला पण तो चालू झाला नाही. ही तिची सर्वात मोठी चूक होती. जर असे झाले तर लॅपटॉप अनेक तास चालू करू नये. बराच वेळ लॅपटॉप चालू करण्याचा प्रयत्न केल्यानंतर, स्वातीने ऑफिसच्या आयटी टीमला फोन केला. टीमने स्वातीला लॅपटॉप ऑफिसमध्ये आणण्यास सांगितले. टीमने लॅपटॉप चालू करण्याचा प्रयत्नही केला पण तो चालू झाला नाही. त्यानंतर, त्यांनी लॅपटॉप जमा केला आणि नंतर घेण्यास सांगितले. २-३ दिवसांनी, स्वातीला आयटी टीमकडून फोन येतो आणि तिला सांगितले जाते की लॅपटॉप पाण्यामुळे खराब झाला आहे. त्याचे मदरबोर्ड, डिस्प्ले, हार्ड ड्राइव्ह इत्यादी ३-४ भाग खराब झाले आहेत.
- स्वातीला इतके मोठे नुकसान झाले... : नुकसान झाल्यामुळे स्वातीला लॅपटॉप दुरुस्त करण्यासाठी आवश्यक असलेले पैसे देण्यास सांगण्यात आले. तिने टीमकडे अंदाजे किंमत विचारली तेव्हा तिला सांगण्यात आले की त्याची किंमत सुमारे ३० हजार रुपये असेल. म्हणजेच जवळजवळ नवीन लॅपटॉपइतकीच किंमत. आम्ही तुम्हाला सांगतो की लॅपटॉप डेल कंपनीचा होता.
- अशा वेळी काय कराल? : जर तुम्हीदेखील अशा परिस्थितीत अडकलात तर सर्वप्रथम लॅपटॉप वाळवा. यासाठी तुम्ही हेअर ड्रायर वापरू शकता. लॅपटॉपचे सर्व पोर्ट कोरड्या कापडाने व्यवस्थित पुसून टाका. याशिवाय, लॅपटॉप चार्जिंगवर ठेवू नका. यामुळे शॉर्ट सर्किट होऊ शकते. स्वातीने केलेली चूक म्हणजे लॅपटॉप चालू करू नका. पावसात भिजल्यानंतर, लॅपटॉप किमान १३-१४ तास चालू करू नये.

# तुमच्याकडे डास मारणारी मशीन नेहमीच चालू असते?

**बऱ्याच घरांमध्ये, एक लहान डास मारणारी मशीन नेहमीच सॉकेटमध्ये जोडलेली असते. जेव्हा तुम्हाला कळले, की ती छोटी मशीन तुमच्या खिशातून दर क्षणी किती पैसे काढत आहे, तर तुम्ही ती कधीही प्लग इन करून ठेवणार नाही.**

अनेकदा असे दिसून येते की लोक त्यांच्या घरात डास प्रतिबंधक यंत्र लावलेले ठेवतात. बरेच लोक याकडे लक्ष देत नाहीत. कारण त्यांना वाटते की एवढे लहान यंत्र वापरू वापरून ती काय वीज वापरणार... जर तुम्हीही असाच विचार करत असाल, तर ही बातमी शेवटपर्यंत वाचल्यानंतर तुमचा विचार बदलेल. खरंतर, डास मारण्यासाठी येणाऱ्या इलेक्ट्रिक मशीनमध्ये एक छोटा हीटर असतो, म्हणून तो तुमच्या घराचा वीज मीटर दर सेकंदाला फिरवतो. आता ज्यांच्या घरात सॉकेटमध्ये डास मारण्याचे मशीन असते त्यांच्याकडून किती वीज वाया जाते याबद्दल सविस्तर बोलूया.

- मशीनमध्ये छोटेसे हिटर : ऑल आउट किंवा गुडनाईट सारख्या डास मारण्याच्या यंत्रांमध्ये एक लहान इलेक्ट्रिक हीटर बसवलेले असते. हे हीटर मशीनमध्ये बसवलेल्या द्रव बाटलीला गरम करते आणि द्रवाचे गॅसमध्ये रूपांतर करून डासांना मारते. ते दररोज खूप वीज वापरते. त्यामुळे नेहमी सॉकेटमध्ये प्लग केलेले ठेवणे योग्य नाही.
- एका वर्षात किती वीज वापरली जाईल? : जर आपण वरील गणनेकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले तर एक मशीन ४३.८ युनिट वीज वापरते. आता जर एका युनिट विजेचा सरासरी खर्च ५ रुपये गृहीत धरला तर एका मशीनची किंमत २१९ रुपये आहे. जर एका घरात अशा किमान २ मशीन असतील तर त्यांचा वार्षिक खर्च ४३८ रुपये येतो. म्हणूनच अशा मशीन वापरल्यानंतर बंद करण्याचा किंवा सॉकेटमधून काढून टाकण्याचा सल्ला दिला जातो.
- एकट्या दिल्लीत किती वीज खर्च होते? : २०११ च्या जनगणनेनुसार दिल्ली शहराची लोकसंख्या १.६८ कोटी होती. २०२५ मध्ये ते २.१० कोटी होईल असा अंदाज आहे. आता जर आपण गृहीत धरले की एका घरात सरासरी ५ सदस्य आणि प्रत्येक घरात एक मशीन असेल, तर एकट्या दिल्लीत वर्षाला ९२ कोटी रुपये वाया जातात. यात काही शंका नाही की प्रत्यक्ष आकडा आणखी मोठा असेल आणि जर आपण देशाच्या दृष्टीने त्याची गणना केली तर आपल्याला आणखी धक्कादायक निकाल मिळतील. अशा परिस्थितीत, जर तुम्ही तुमच्या घराच्या कोणत्याही सॉकेटमध्ये अनावश्यकपणे बसवलेले हे डास मारणारे मशीन बंद केले तर केवळ पैसेच नाही तर वीज देखील वाचेल.



### डास मारण्याचे यंत्र किती वीज वापरते?

गुडनाईट किंवा ऑल आउट सारख्या डास मारण्याच्या यंत्रांमध्ये ५ ते ७ वॅट वीज वापरली जाते. त्यानुसार, जर हे यंत्र दिवसभर सॉकेटमध्ये प्लग केलेले राहिले तर ते किमान ०.१२ युनिट वीज वापरते. त्यानुसार, ३० दिवसांत, हे एक मशीन एका महिन्यात ३.६ युनिट वीज वापरते. आता जर एका युनिट विजेचा सरासरी खर्च ५ रुपये गृहीत धरला (जो प्रत्येक राज्यात वेगळा असतो), तर एका मशीनला महिन्याला १८ रुपये खर्च येतो. येथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे बहुतेक घरांमध्ये अशा ३ ते ४ मशीन सहज आढळतात.

# फोनला कायम चिकटलेली असते पॉवर बँकची केबल?



**स्मार्टफोन खरेदी करताना बहुतेक लोक त्याच्या बॅटरी क्षमतेकडे लक्ष देतात. आजकाल लोकांना असा स्मार्टफोन हवा असतो जो एका पूर्ण चार्जवर दिवसभर चालेल. तथापि, जास्त वापरामुळे स्मार्टफोन लवकर डिस्चार्ज होतो. बऱ्याचदा लोक अशा ठिकाणी असतात जिथे फोन चार्ज करण्याचा पर्याय नसतो. अशा परिस्थितीत लोक पॉवर बँक वापरतात. त्याच वेळी, काही लोक पॉवर बँक अधिक वापरतात. तथापि, तुम्हाला माहिती आहे का की पॉवर बँकने स्मार्टफोन चार्ज करणे योग्य आहे की नाही? यामुळे तुम्हाला मोठी समस्या देखील निर्माण होऊ शकते. चला जाणून घेऊया...**

### तुम्ही पॉवर बँकने स्मार्टफोन चार्ज करता का?

स्मार्टफोन आणि इतर गॅझेट्स चार्ज करण्यासाठी पॉवर बँकचा वापर केला जातो. काही लोक पॉवर बँक जास्त वापरण्यास सुरुवात करतात, परंतु हे टाळले पाहिजे. यामुळे त्यांच्या स्मार्टफोनचे मोठे नुकसान होऊ शकते. जर तुम्ही पॉवर बँक जास्त वापरत असाल तर आम्ही तुम्हाला सांगतो की फोनच्या बॅटरी लाइफवर वाईट परिणाम होतो. आयफोन वापरकर्त्यांसाठी हे आणखी धोकादायक ठरू शकते, कारण आयफोनची बॅटरी क्षमता लवकर कमी होते. जर तुम्ही पॉवर बँक वापरत असाल तर लक्षात ठेवा की स्मार्टफोनची बॅटरी अकाली खराब होण्याची भीती असते.

### गरम होण्याची समस्या

पॉवर बँक तुमच्या स्मार्टफोनला चार्ज करण्यासाठी बराच वेळ घेऊ शकते. यामुळे, फोन बराच वेळ चार्जिंगवर ठेवल्याने ते गरम होण्याची समस्या उद्भवू शकते. जेव्हा तुमच्याकडे पॉवर बँक असते, तेव्हा तुम्ही फोन थोडासा डिस्चार्ज झाला तरीही तो चार्जिंगवर ठेवता, जे योग्य नाही.

### या गोष्टी लक्षात ठेवा

जर तुम्ही पॉवर बँक वापरत असाल तर लक्षात ठेवा की चांगल्या कंपनीची पॉवर बँक खरेदी करा आणि फोन जास्त चार्ज करू नका. पॉवर बँक फास्ट चार्जिंगला सपोर्ट करते जेणेकरून स्मार्टफोन लवकर चार्ज होईल. पॉवर बँकमध्ये स्मार्ट पॉवर मॅनेजमेंट आणि ॲडव्हान्स्ड १२ लेयर सर्किट प्रोटेक्शनसारखी वैशिष्ट्ये असावीत.



# आधार कार्डची मुदत संपते का? वैधता कशी तपासाल?

**आधार कार्डशी संबंधित सेवा मिळविण्यासाठी तुम्ही सरकारी वेबसाइट UIDAI ला भेट देऊ शकता. तुम्ही वेबसाइटला भेट देऊन आधार कार्ड अपडेट देखील करू शकता. तसेच, वेबसाइटवर अशा अनेक इतर सेवा उपलब्ध आहेत, ज्या लोकांसाठी खूप उपयुक्त ठरू शकतात. तुम्हाला माहिती आहे का की वेबसाइटवर आधार कार्डची वैधता तपासण्याचा पर्यायदेखील आहे. हो, तुम्ही याद्वारे तुमच्या आधार कार्डची वैधता तपासू शकता.**




- आधार कार्ड देखील एक्सपायर होते का? : जर तुम्हाला वाटत असेल की आधार कार्ड देखील ड्रायव्हिंग लायसन्स किंवा पासपोर्ट प्रमाणे एक्सपायर होते, तर तसे नाही. एकदा आधार कार्ड बनवल्यानंतर ते आयुष्यभर वैध असते. तथापि, तुम्ही आधार कार्डमधील माहिती जसे की पत्ता आणि नाव इत्यादी बदलू शकता, परंतु आधार क्रमांक आणि कार्ड तेच राहतात.
- आधार वैधता तपासा पर्यायाचा अर्थ काय आहे? : आता तुम्ही विचार करत असाल की आधार कार्डची वैधता नाही, तर UIDAI वेबसाइटवरील आधार सेवांमध्ये आधार वैधता तपासा हा पर्याय का उपलब्ध आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की येथे वैधता म्हणजे वैध. येथे तुम्ही आधार कार्ड नंबर प्रविष्ट करू शकता आणि त्या क्रमांकाचे आधार कार्ड अस्तित्वात आहे की नाही ते पाहू शकता. स्क्रीन आधार क्रमांकासह अस्तित्वात आहे असे दर्शवते. या वैधतेचा अर्थ आधार कार्डचे अस्तित्व शोधणे आहे.

### आधार कार्डची वैधता कशी तपासायची?

- स्टेप १- आधार कार्डची वैधता तपासण्यासाठी, प्रथम UIDIA च्या अधिकृत वेबसाइटवर जा.
- स्टेप २- यानंतर, तुम्हाला वरच्या उजव्या बाजूला असलेल्या My Aadhaar सेक्शनवर क्लिक करावे लागेल.
- स्टेप ३- आता तुम्हाला Aadhaar Services वर जावे लागेल.
- स्टेप ४- येथे Check Aadhaar Validity या पर्यायावर क्लिक करावे लागेल.
- स्टेप ५- आता तुम्हाला तुमचा आधार क्रमांक टाकावा लागेल आणि कॅप्चा कोड सबमिट करावा लागेल.
- स्टेप ६- हे करताच, तुमच्या आधार कार्डचे अस्तित्व स्क्रीनवर कळेल.

### हे तपशील दिसतील

स्क्रीनवर व्यक्तीची वय श्रेणी दिसेल. याचा अर्थ त्याचे वय किती ते किती दरम्यान आहे. तसेच, आधार क्रमांकाचे शेवटचे अंक दिसतील. याशिवाय, स्क्रीनवर आधार कार्डची कोणतीही माहिती दिसणार नाही. जर आधार वैध नसेल तर स्क्रीनवर कोणतीही माहिती दिसणार नाही. अशा प्रकारे तुम्ही कोणाच्याही आधारची वैधता तपासू शकता. जर तुम्हाला वाटत असेल की तुमच्या समोरच्या




व्यक्तीने तुम्हाला चुकीचा आधार क्रमांक दिला आहे, तर तुम्ही वर नमूद केलेल्या चरणांचे अनुसरण करून त्याची वैधता तपासू शकता. ही पद्धत सर्वात सोपी आहे आणि समोरच्या व्यक्तीला हे देखील माहित नसते की तुम्ही त्याच्या आधारची वैधता तपासली आहे.

# गणेशोत्सव मंडळांकरिता राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन; ५ लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक

**मुंबई (प्रतिनिधी)**– पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. सदर स्पर्धेचा अर्ज पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ऑनलाईन पोर्टलद्वारेच २० जुलै पासून २० ऑगस्ट २०२५ पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. अपूर्ण अर्ज रद्द ठरविण्यात येतील.

सदर स्पर्धा निःशुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट, ध्वनिप्रदूषणरहित वातावरण, गणेश भक्तांसाठी केलेल्या सोयीसुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल.

२७ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी 'गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सवस्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे हे ४ जिल्हे प्रत्येकी ३ आणि हे ४ जिल्हे वगळता अन्य ३२ अशा प्रत्येक जिल्ह्यांतून एक यानुसार एकूण ४४ शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपापल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २.५ लाख आणि १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हा–स्तरीय प्रथम विजेत्यांना २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेतगणेशमंडळांनीअधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.

# शेळ्या चोरणारी टोळी कुंटूर पोलिसांच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)**– नायगाव तालुक्यातील कुंटूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत शेळ्या चोरणारी टोळी मागील काही दिवसांपासून सक्रिय झाली होती. या टोळीने अनेक ठिकाणांहून शेळ्या चोरल्या होत्या. अखेर ही टोळी कुंटूर पोलिसांच्या जाळ्यात अडकली असून, चोरलेल्या सहा शेळ्या पोलिसांनी जप्त केल्या आहेत.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्ह्यातील पोलीस स्टेशनला दाखल झालेल्या चोरी, घरफोडी, जबरी चोरी गुन्ह्यातील आरोपीतांना अटक करुन त्यांच्याकडून गुन्ह्यातील गेलेला माल हस्तगत करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने १६ जुलै रोजी अंदाजे सहा वाजता ते १७ जुलै रोजी पहाटे चार वाजताचे सुमारास फिर्यादी बालाजी सूर्यकार यांच्या अंगणवाडी समोरील रिकाम्या प्लॉटमध्ये बांधलेल्या काळी बांडी रंगाच्या एकूण ५ शेळ्या किमत ५८ हजार रुपये व शेळगाव (छत्री) येथील सूर्यकांत पिराजी सालेगाये यांची एक तांबडी व ढवळ्या रंगाची शेळी किंमत २० हजार रुपयांची असा एकूण ७८ हजार रुपयाच्या शेळ्या आरोपी शेख अश्फाक शेख बाबा (वय २१ वर्ष रा. देशमुख गल्ली बिलोली ता. बिलोली जि. नांदेड), सय्यद अलीम ईस्माईल (वय २१ वर्ष रा. बिलोली जि. नांदेड), समीर अब्दुलनबी रा. राहेर ता. नायगांव जि. नांदेड, शेख ईरफान बाबु रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड यांनी चोरुन नेऊन बांसवाडा (राज्य तेलंगणा) येथील बाजारात विक्री करीत असतांना आरोपी क्रमांक १ व २ हे मुद्देमालासह मिळून आले आहेत.


## टी.सी हरवली

माझे यशवंत विनायकराव येवतीकर या नावाची नारायणराव चव्हाण विधि महाविद्यालय नांदेडची एल.एल.बी प्रथम वर्षाची टी.सी. तसेच गुणपत्रक तरोडा नाका ते श्रीनगर ऑटो प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील मोबाईल वर संपर्क साधावा.–

**–संपर्क पत्ता–**
**यशवंत येवतीकर आई प्लॉट क्र.३ छत्रपती शिवाजीनगर मालेगाव रोड नांदेड मो.९८२३७१५५६७**

## Change In Name

My (old name) is RUMANA FIRDOS which now I am, changing as (new name) RUMANA FIRDOS SHAFIUR RAHEMAN Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by-RUMANA FIRDOS SHAFIUR RAHEMAN

Add:- LAKDOBA CHOWK HIMAYATNAGAR DIST NANDED 431802 MO.9011887585


## शीला देशपांडे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – यशोविहार नगरी येथील रहिवाशी व वीज मंडळातील सेवानिवृत्त कर्मचारी सुधीर भगवानराव देशपांडे यांच्या पत्नी सौ. शीला सुधीर देशपांडे पिंपळगावकर (वय ६५) यांचे दीर्घ आजाराने शुक्रवारी दुपारी ३.१५ च्या सुमारास राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सून, २ मुली, जावई, नातवंड असा परिवार आहे. स्व. शीला देशपांडे यांच्या पार्थिवावर उद्या दि. १९ जुलै रोजी सकाळी ९.३० वाजता गोवर्धनघाट येथील शांतीधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, असे त्यांच्या निकटवर्तीयांनी कळविले आहे.



# अर्धापूर येथे दोन वेगवेगळ्या अपघातात दोन जण गंभीर जखमी

**अर्धापूर (प्रतिनिधी):** अर्धापूर हद्दीत असलेल्या विविध महामार्गावर दोन अपघात झाले आहेत. या अपघातात दोनजण गंभीर जखमी झाले तर अन्य काही जण किरकोळ जखमी झाले आहेत.

अर्धापूर तालुका हद्दीत असलेल्या बारड रोडवरील खैरगाव पाटीजवळ शुक्रवारी दुपारी दुचाकी समोर कुत्रा आल्याने गाडी स्लिप होऊन पडल्याने रिंकू जाधव पिंपळकौठा ता. मुद–खेड हा गंभीर जखमी झाला आहे तर गुरूवारी रात्री १२ वाजता ऑटो क्र. एम. एच. २६ टी.९५५५ पलटी होऊन यात विलास आनंदा जाधव वय ३० वर्षे, शिवराज गोपीनाथ मुंके वय २९ वर्षे दोघे रा. तळणी ता. बिलोली हे गंभीर जखमी झाले. एक जण ऑटो खाली दबलेला होता. घटनास्थळी नागरिकांनी मदत करत जखमींना बाहेर काढले. सदर अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्रचार्य संस्थान नानिज–धाम रुग्णवाहिका चालक राजू पाचंगे,१०८ रुग्णवाहिका डॉ. आनंद शिंदे, चालक मारोती गिरी यांनी घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्तांना शासकीय रुग्णालय विष्णुपुरी नांदेड येथे पुढील उपचारासाठी दाखल केले.

# दामाजीराव ईरमलवार यांचे निधन



**नांदेड–** व्यंकटेश नगर, हिंगोली गेट येथील रहिवासी बंडूराव (दामाजीराव) गंगाधरराव ईरमलवार (वय ६८) यांचे शुक्रवार, दि. १८ जुलै रोजी रात्री १ वाजता अकाली निधन झाले.

शुक्रवार, दि. १८ जुलै रोजी दुपारी ३ वाजता त्यांचे राहते घर व्यंकटेशनगर नांदेड येथून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात येऊन गोवर्धन घाट स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, एक मुलगी, दोन मुले व नातवंडे असा परिवार आहे. ईरमलवार यांनी दैनिक लोकपत्रसह विविध वर्तमानपत्रांमध्ये काम केले आहे. पत्रकार दीपक ईरमलवार यांचे ते वडील होत.


## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड
## ई–निविदा सूचना
## क्रमांक (०६) सन २०२५–२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड जि. नांदेड ( दुरध्वनी क्रमांक ०२४६२–२५३७११) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून नांदेड जिल्ह्यातील एकूण १० कामांकरीता बी–१ नमुन्यातील ई–निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे.

टीप – १) निविदा कागदपत्राचा तपशिल महाराष्ट्र शासनाच्या ई–टेंडरींग संकेतस्थळ https://mahatenders.gov.in आणि www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

२) सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.

३) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता,

सार्वजनि बांधकाम विभाग, नांदेड जि.नांदेड यांना राखुन ठेवला आहे

**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड**

## Change In Name

I HAVE CHANGED MY NAME FROM OLD NAME :- SYED ZAMEER SYED GANI TO NEW NAME :- SYED ZAMEER

ADDRESS:- H. NO H. No 9-7-577, Zirat Road Gulshan Colony Itwara Nanded - 431604 Mob No : 8379832634


# अवैध कत्तलीसाठी जाणारे चार गोवंश पकडले; दोघांवर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– कत्तलीसाठी एका वाहनात कोंबून चार गोवंश नेत असल्याची माहिती मरखेल पोलिसांना मिळाली. या माहितीवरून त्यांनी कारवाई केली. यावेळी चार गोवंशाला जीवदान मिळाले. या प्रकरणी पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मरखेल पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अवैध कत्तलीसाठी गोवंश पीकअप वाहन क्रमांक (एमएच२६–एच–८८ ५१) मधून जात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी मरखेल रस्त्यावर सापळा रचून वरील क्रमांकाचे वाहन तपासण्यासाठी थांबवले असता त्यात चार गोवंश (जवळ–पास किंमत एक लाख वीस हजार रुपये) आढळून आले. त्या गोवंशाबद्दल माहिती विचारली असता चालकांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. यावेळी गोवंश व संबंधित वाहन जप्त केले. मरखेल पोलीस ठाण्यात राजीव बापूराव नागठाणे (वय ४१ रा. कल्याणनगरी नायगाव) आणि विठ्ठल घाळप्पा मचकुरे (वय ७० रा. बोरुळ ता. औराद कर्नाटक) या दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस हवालदार बारी करत आहेत.

## पद्मीनबाई बुक्के यांचे निधन

**नरसीफाटा (प्रतिनिधी)**– नरसी जुनेगाव येथील ज्येष्ठ महिला पद्मीनबाई रामचंद्र बुक्के (वय ८५ वर्षे) यांचे शुक्रवार, दि. १८ जुलै रोजी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. १९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता नरसी जुनेगाव ता. नायगांव येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

पद्मीनबाई बुक्के यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंड असा परिवार आहे. त्या सामाजिक कार्यकर्ते मारोतराव बुक्के यांच्या मातोश्री होत.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## Change In Name

My (old name) is JAFAR JAVEED which now I am, changing as (new name) JAFFAR JAVEED SIDDIQUI Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by-JAFFAR JAVEED SIDDIQUI

Add:- S/O Mohammed Joharul Hak, H.No.6-2-142, sayyadan mohalla, near Sayyad Ismail Kadri Masjeed, sarafa, itwara Nanded S.O, Dist :- Nanded, Maharashtra-431604 M.No.9764079773


## जाहीर प्रगटन

लिहुन देणारः– व्यंकट रामराव मोरे वय ७० वर्ष धंदा पेन्शनर, सुर्यानगर, तरोडा कॅनल रोड, नांदेड.

लिहुन घेणार :– निरंजन मारोत्ती पवार वय ३३ वर्षो, धंदा नौकरी, ११. नंदनवन, ता. कंधार, जि. नांदेड.

कारणो मी लिहुन देणार नामे व्यंकट रामराव मोरे , दिनांक १७–७–२०२५ रोजी सौदाचिठठी लिहुने दतो की, माझे मालकी ताब्यातील नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील माझ्या मालकीतील व कबज्यातील असलेली वाघाळा येथील गट नंबर ८३ पैकी एक प्लॉट ज्याचा प्लॉट नंबर ८९ आहे. ज्याची लांबी दक्षिण–उत्तर ४० फुट म्हणजे१०१९ मिटर आहे व रूदीपुर्व–पश्चीम ४.३०फुट म्हणजे ९० १४मिटर आहे. ज्याचे एकुण्ण क्षेत्रफळ १२००चौ. फुट एवढे असे ज्याची चतुसिमा – पुर्वस प्लॉटनं. ९० पश्चिमेस–प्लॉट नंबर ८८ आहे.दक्षिणेस २० फुट रोड आहे. उतरेस प्लाटनंबर आहे. वरील चतुः सेमच्या अत्तील वर्णनाचा प्लाट आंतरीक व न्याय हक्कासह मी लिहुन घेतला आहे.

या प्लाटची एकुण विक्री रक्कम २२,५१,०००/– (अक्षरी बावीस लाख एकावन हजार रुपये ला प्लॉट कायमस्वरुपी लिहुन घेतला् असुन विक्री करण्याचा करार केला आहे.दिनांक १७.७. २०२५ रोजी लिहुन घेणार यांच्याकडुन सवरील प्लॉटचे सौदा चिठठीपोटी बयान रकम रक्कम १,००,०००/– एक लाख पंचासमक्ष दिली आहे, उर्वरित रक्कम रजिस्टरी करते वेळेस देण्यात येईल असे ठरले आहे.

सदरील प्लाट् हयापुर्वी कोणास शासकीय, निमशासकीय, बॅन्केच कर्ज बोझा नाही. तसेच सादरील प्लॉटचे विक्रीस माझे वारसांचा कोणाताही आक्षेप नाही काही निघाल्यास त्यास मी स्वत लिहुन देणार जबाबदार राहीन.

म्हणुनही सौदा चिठठी लिहुन माझी सही केली ती सत्य व खरी आहे. या बाबत कोणास आक्षेप असल्यास सात दिवसांच्या आत लेखी कळवावे या नंतर ग्राह्य धरले जाणार नाही,करीता हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करीत आहोत.

**लिहुन घेणार.**
**निरंजन मारोती पवार**
**रा.नंदनवन, तालुका कंधार, जिल्हा नांदेड.**

## जाहीर प्रगटन

(भोकर येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर यांचे न्यायालयात श्री. रवि शिवाजीराव इरले २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १६३/२०२५

अर्जदार – १. रेखा भ्र.सुरेश पवार वयः ३७ वर्षे, धंदा :घरकाम रा.येहळेगाव तुकाराम ता.कळमनुरी जि.हिंगोली २.सुनिता भ्र.लक्ष्मण मंजुळकर वयः ४० वर्षे, धंदा : घरकाम रा. हिस्सेबोराळा ता.जि.वाशिम

विरूध्द –

गैरअर्जदार–निरंक

विषय –कलम ३ मुंबई रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ कायद्याप्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दिवाणी किरकोळ अर्ज केला आहे की,मयत ही अर्जदार क्र.१ ते २ यांचे वडील आहे अर्जदार क्र.१ ते २ या मयताच्या मुली आहेत.मयत नामे मारोती नानु दंडेवाड हे दिनांक २७/३/१९९९ रोजी दिवशी खु ता.भोकर जि.नांदेड येथे मयत झाल्या.अर्जदार क्र.१ ते २ हेच मयत नामे मारोती नानु दंडेवाड यांचे कायदेशीर वारस आहेत. असे वारसाचे म्हणणे आहे.

मयत नामे मारोती नानु दंडेवाड यांचे अर्जदार हाच त्यांचे कायदेशीर वारस आहेत.हे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचा उजर अथवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपले लेखी म्हणणे सादर करावे. अन्यथा त्यानंतर कोणाचाही आक्षेप नाही, असे समजुन अर्जदारातर्फे एकतर्फी निर्णय दिला जाईल. याची नोंद घ्यावी. आज दिनांक १७ जुलै २०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरून**
**क.लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर भोकर**

## जाहीर प्रगटन

(भोकर येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर यांचे न्यायालयात श्री. आर.एस इरले २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १६७/२०२५

अर्जदार – १. गोपाळराव पि.उत्तमराव सावंत (गोरठेकर) वयः ४३ वर्षे, धंदा : शेती २. उत्तमराव पि.गोपाळराव सावंत (गोरठेकर) वय ७० वर्षे धंदा शेती दोघे रा.महागांव ता.भोकर जि.नांदेड

विरूध्द –

गैरअर्जदार–शाखा व्यवस्थापक शाखाप्रमुख नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.शाखा किनी ता.भोकर जि.नांदेड

विषय –भारतीय वारसा कायद कलम ३७२ प्रमाणे वारसा प्रमाणप मिळणे बाबत.

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दिवाणी किरकोळ अर्ज केला आहे की,मयत ही अर्जदार क्र १ यांची आई आहे व अर्जदार क्र.२ यांची पत्नी आहे.मयत नामे आनशाबाई उत्तमराव सावंत (गोरठेकर) हे दिनांक १६/८/२०२३ रोजी निझामाबाद येथे मयत झाले अर्जदार क्र.१ व २ हेच मयत नामे आनशाबाई उत्तमराव सावंत (गोरठेकर) यांचे कायदेशीर वारस आहेत. असे वारसाचे म्हणणे आहे.

मयत नामे आनशाबाई उत्तमराव सावंत (गोरठेकर) यांचे अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत.अर्जदारांना मयत नामे आनशाबाई उत्तमराव सावंत (गोरठेकर) यांचे बचत खाते क्र ११२९११११११०३०८६ मध्ये गैरअर्जदार शाखा व्यवस्थापक नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.शाखा किनी ता.भोकर जि.नांदेड यांच्याकडे जमा रक्कम ५४,१८०/– रूपये रक्कम काढणे कामी वारसा हक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

हे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचा उजर अथवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपले लेखी म्हणणे सादर करावे. अन्यथा त्यानंतर कोणाचाही आक्षेप नाही, असे समजुन अर्जदारातर्फे एकतर्फी निर्णय दिला जाईल. याची नोंद घ्यावी. आज दिनांक १७ जुलै २०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरून**
**क.लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर भोकर**

## जाहीर प्रगटन

(भोकर येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर यांचे न्यायालयात श्री. रवि शिवाजीराव इरले २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १६२/२०२५

अर्जदार – १. व्यंकटराव पि.रामराव पाटील किन्हाळकर वयः ७३ वर्षे, धंदा :शेती रा.नवा मोंढा भोकर ता.भोकर जि.नांदेड २. गोविंद पि.रामराव किन्हाळकर वयः ६२ वर्षे, धंदा : घरकाम रा.इंद्रप्रस्थ नगर नांदेड ता.जि.नांदेड ३. सत्यशिला भ्र.आप्पासाहेब काळे वयः ७७ वर्षे, धंदा : घरकाम रा.हिंपळनेर ता.जि.लातूर

विरूध्द –

गैरअर्जदार–निरंक

विषय –कलम ३ मुंबई रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ कायद्याप्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दिवाणी किरकोळ अर्ज केला आहे की,मयत ही अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील आहे अर्जदार क्र.१ ते २ हे मुले व अर्जदार क्र.३ ही मुलगी आहे. मयत नामे रामराव सटवाजी पाटील हे दिनांक २४/६/१९९९ रोजी नवा मोंढा भोकर ता.भोकर जि.नांदेड येथे मयत झाल्या.अर्जदार क्र.१ ते ३ हेच मयत नामे रामराव सटवाजी पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. असे वारसाचे म्हणणे आहे.

मयत नामे रामराव सटवाजी पाटील यांचे अर्जदार हाच त्यांचे कायदेशीर वारस आहेत.हे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचा उजर अथवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपले लेखी म्हणणे सादर करावे. अन्यथा त्यानंतर कोणाचाही आक्षेप नाही, असे समजुन अर्जदारातर्फे एकतर्फी निर्णय दिला जाईल. याची नोंद घ्यावी.आज दिनांक १७ जुलै २०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरून**
**क.लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर भोकर**


## Change In Name

My (old name) is ZARINA SULTANA ATHAR JAVEED which now I am, changing as (new name) JARINA SULTANA ATHAR JAVED Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by- JARINA SULTANA ATHAR JAVED

Add:- W/O Athar Javed, H.No.6-2-139, sayyadan mohalla, near urdu school, sarafa, itwara Nanded S.O, Nanded, Maharashtra-431604 M.No.9673829877

## टी.सी हरवली

माझी मनोज गणपतराव जाधव या नावाची इयत्ता १२ वी पास ची टि.सी नरसी ते देगलुर प्रवासात हरवली आहे.कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा. **–संपर्क पत्ता– मनोज गणपतराव जाधव मु.पाचपिंपळी पो.कोल्हेबोरगाव ता.बिलोली जि.नांदेड मो. –८८०६६१८४९९**

## टी.सी हरवली

माझे सुनिल नारायणराव मांगुळकर या नावाने महाराष्ट्र स्टेट फार्मसी कॉन्सील मुंबई रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट नंबर २२००७ व डायरी पि.पी.कार्ड मुळ कागदपत्रे लातूर फाटा ते सिडको दुचाकीवरून प्रवास करताना हरवले आहे ,कोणास सापडल्यास खालील मोबाईल वर संपर्क साधावा.**–संपर्क पत्ता– सुनिल नारायणराव मांगुळकर संदीप मेडिकल सिडको नवीन नांदेड मो.९५५२७४७११५**


## जाहीर प्रगटन

BEFORE THE HONOURABLE DEPUTY REGISTRAR OF CHITS AT NIZAMABAD
ARB No. 34 / 2025
BETWEEN:
M/s ShubhaDarshhini Chits Pvt Ltd Bodhan Br,
Disputent
Vs SAINATH SAYANNA MADASWAR & Others
Opponents
To

OPP 1) SainathSayannaMadaswar s/o.SayannaMadaswar, age 27 years, R/o, H.No.156, Nava Mondha, Surewadi, Aurangabad District, Maharashtra State. Cell: 8668870137.

OPP 2)LaxmanKheshetti s/o. IrwanthRaoKhemshetti, age 30 years, Occ. Assist Teacher, Saraswathi Primary School, BurudGally, BiloliTaluqa, Nanded District, Maharashtra State, R/o.H.No 3-25/1, Sowna, Kubeer Village, Nirmal District, Telangana State. Cell: 6305668311.

OPP 3) BillaSai Kumar s/o. BillaSallu, age 30 years, Occ. DakSevak, Mosra S.O, MosraMandal, Nizamabad District, Telangana State. R/o. H.No 6-27/4, Someshwar Temple, BodhanMandal, Nizamabad District, Telangana Stat. Cell: 7013908818. The Disputant has filed the dispute for recovery of amount and summon/notice sent on your address are unserved. Whereas the dispute is posted for your appearance on 06/08/2025at 11.30 A.M You are called upon hereby to appear in person before the Hon'ble Deputy Registrar of Chits, Nizamabad on the said date failure of which the dispute will be heard and decided exparte.

// BY order of the Dy.Registrar of Chits//
Sd/- Deputy Registrar of chits Nizamabad.







**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com